

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर • संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, १७ नोव्हेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३३० | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...

- आजच संपर्क करा -

८६९८७८८६६६

९६५७२३२०२६

रोहित पवारांचे प्रसिद्धीच्या हव्यासापोटी खालच्या स्तराचे राजकारण

रोहित पवार यांचे वक्तव्य बालिशपणाचे, चंद्रशेखर बावनकुळे यांचा घणाघात, फडणवीस आणि अजितदादांचे संबंध भावासारखे होते, अजितदादांच्या विमान अपघाताचा पूर्णपणे पर्दाफाश व्हावा यासाठी देवेंद्रजी प्रयत्नशील

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आमदार रोहित पवार यांनी केलेले आरोप अत्यंत खालच्या पातळीचे असून, ते केवळ प्रसिद्धीच्या हव्यासापोटी असे वक्तव्य करत आहेत. रोहित पवार यांनी आरोप करण्यापूर्वी स्वतःची राजकीय उंची लक्षात घ्यावी. प्रसिद्धीच्या हव्यासापोटी त्यांनी महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीची प्रतिमा मलिन करू नये, अशा शब्दांत महसूलमंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्यांचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रोहित पवार यांच्यावर जोरदार टीका केली.

प्रसार माध्यमांशी बोलताना बावनकुळे म्हणाले की, संबंधित विमान कंपनीच्या विमानातून राज्यातील जवळपास ९० टक्के नेत्यांनी प्रवास केला असेल. स्वतः रोहित पवार यांनीही अनेकदा या कंपनीच्या विमानातून प्रवास केला असून, त्यासंदर्भातील छायाचित्रे उपलब्ध आहेत. एखाद्या विमान कंपनीच्या विमानातून प्रवास केला म्हणजे त्या कंपनीशी संबंधित व्यक्तींशी राजकीय संबंध आहेत, असा अर्थ होत नाही. अशा प्रकारचे आरोप करणे म्हणजे अत्यंत



खालच्या पातळीचे राजकारण आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते दिवंगत नेते अजित पवार यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. हा कार्यक्रम रोहित पवारांना आवडला नसावा आणि त्या कार्यक्रमाचे महत्त्व कमी करण्यासाठीच त्यांनी जाणीवपूर्वक अशा प्रकारचे आरोप केले असावेत, अशी शक्यताही बावनकुळे यांनी व्यक्त केली.

शरद पवार यांनी नेहमीच महाराष्ट्राची राजकीय संस्कृती जपली. त्यांनी कधीही प्रसिद्धीचा असा हव्यास दाखवला नाही. रोहित पवार यांनी शरद पवार यांच्याकडून राजकीय संस्कृती कशी जपावी, हे शिकण्याची गरज आहे. रोहित पवार यांचे वक्तव्य बालिशपणाचे असून, अशा प्रकारच्या राजकारणामुळे महाराष्ट्राची राजकीय उंची कमी होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनीही रोहित पवार यांच्या आरोपांबाबत अधिकृत स्पष्टीकरण द्यायला हवे.

फडणवीस-अजितदादांचे संबंध भावासारखे होते

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दिवंगत अजित पवार यांचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे होते. दोघांनीही एकमेकांना भावाप्रमाणे सांभाळले आहे. अजितदादांबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप करून रोहित पवार महाराष्ट्राची प्रतिमा खराब करत आहेत. आमचे सुरुवातीपासूनचे म्हणणे आहे की, अजितदादांच्या विमान अपघातामागील संपूर्ण सत्य समोर आले पाहिजे आणि या घटनेचा पूर्णपणे पर्दाफाश झाला पाहिजे. यासाठी देवेंद्रजी स्वतः खूप प्रयत्न करत आहेत. त्यांनी यासाठी काय काय प्रयत्न केले आहेत, याची मला माहिती आहे; मात्र काही गोष्टी ते सार्वजनिकरीत्या सांगू शकत नाहीत, असेही बावनकुळे म्हणाले.

अशा आरोपांमुळे देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिमेवर कोणताही परिणाम होणार नाही. मात्र, ज्यांच्याशी आमचे पारिवारिक संबंध आहेत, अशा व्यक्तींवर अशा प्रकारचे आरोप केले जातात, याचे दुःख वाटते. अशा व्यक्तींना मानहानीची नोटीस पाठवायची का? खरे तर रोहित पवार यांनी स्वतःच आत्मपरीक्षण करावे. राज्यातील जनतेच्या मनात त्यांची प्रतिमा कमी झाली आहे, हीच त्यांच्यासाठी मोठी मानहानी आहे, असे बावनकुळे यांनी सुनावले.

रोहित पवारांना पश्चात महत्त्व मिळत नसल्याने अशी वक्तव्ये ?

रोहित पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बाजूला सारले जात असल्याचे दिसत आहे. पक्षात त्यांना कोणी विचारत नसल्यामुळे ते अशा प्रकारची वक्तव्ये करत असावेत. शरद पवार यांच्या गटातून बाहेर पडण्यासाठी जाणीवपूर्वक वेगळे राजकीय वातावरण निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न असावा, अशी टीकाही बावनकुळे यांनी केली.


डिलिमिटेशनला सुप्रिया सुळे मदत करत असतील तर अभिनंदन

मतदारसंघांच्या पुनर्रचनेच्या (डिलिमिटेशन) मुद्द्यावर बोलताना बावनकुळे म्हणाले की, सुप्रिया सुळे यांनी मांडलेली भूमिका देशाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

आज अनेक लोकसभा मतदारसंघांचे क्षेत्रफळ सुमारे ३०० किलोमीटर, तर विधानसभा मतदारसंघांचे क्षेत्रफळ सुमारे १५० किलोमीटरपर्यंत आहे. काही मतदारसंघांमध्ये ४० ते ४५ लाख लोकसंख्या झाली आहे. त्यामुळे मतदारसंघांची पुनर्रचना होणे आवश्यक आहे.

विकसित भारताच्या उभारणीसाठी लोकप्रतिनिधींची संख्या वाढणे गरजेचे आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यात अधिक प्रभावी समन्वय राहिल्यास विकासकामांना गती मिळू शकते. त्यामुळे डिलिमिटेशनच्या प्रक्रियेला सुप्रिया सुळे मदत करत असतील, तर मी त्यांचे अभिनंदन करेन, असेही बावनकुळे म्हणाले.

एअर हॉस्टेसच्या मृत्यूने गोंदियात खळबळ





दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया

वैनगंगा नदीकाठावरील दवनीवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या अर्जुनी-बोंडरणी येथील देवस्थान परिसरातील जंगलात पुणे येथील धानोरी परिसरातील एका खासगी विमान कंपनीत एअर हॉस्टेस असलेल्या आणि दिवाळीच्या सुट्टीत माहेरी गेलेल्या ३५ वर्षीय महिलेची धारदार चाकूने वार करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली.

वर्षा पुरनलाल तुरकर (३५) रा. किन्ही-नवेगाव, ता. वारासिवनी, जि. बालाघाट, (मध्य प्रदेश) असे मृत महिलेचे नाव आहे. तीन अज्ञात व्यक्तींनी चाकूचा धाक दाखवून लुटमार केल्यानंतर तिच्यावर प्राणघातक हल्ला केल्याची माहिती तिच्यासोबत असलेल्या नितेश अग्रवाल याने पोलिसांना दिली. या अधारे दवनीवाडा पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार वर्षा हिने २०१९ मध्ये पुणे येथील एका तरुणासोबत प्रेमविवाह केला होता. ती धानोरी (पुणे) येथे वास्तव्यास होती आणि एअर इंडिया कंपनीत लाईन ऑपरेटर म्हणून कार्यरत होती. पतीची इंदूर येथे बदली झाल्याने तो सध्या तेथे नोकरी करीत आहे. दिवाळीनिमित्त वर्षा आपल्या तीन वर्षीय मुलीसह माहेरी शेजारील मध्यप्रदेश राज्यातील किन्ही-नवेगाव येथे आली होती.

१४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास तिने मुलीला आई-वडिलांकडे ठेवले आणि निरोप नरेश अग्रवाल (४१) रा. मनोहर चौक, गोंदिया याच्यासोबत कारने तिरोड्याकडे जाण्यासाठी प्रस्थान केले. दरम्यान, अर्जुनी-बोंडराणी येथील वैनगंगा नदी काठावरील श्रीराम मंदिर परिसरातील जंगलात त्यांनी कार उभी केली. सायंकाळी ५.३० ते रात्री ६ वाजताच्या सुमारास दोघे जंगलात बसून गप्पा मारत असताना तीन अज्ञात व्यक्ती तेथे येऊन तिघांनी चाकूचा धाक दाखवून लुटमार केली आणि वर्षाच्या पोटावर धारदार चाकूने वार करून घटनास्थळावरून पळ काढल्याचे नितेशने पोलिस व तिच्या नातेवाईकांना सांगितले.

घटनेची माहिती मिळताच वर्षाचे नातेवाईक मध्य प्रदेशातील खैरलांजी येथून घटनास्थळी पोहोचले. गंभीर जखमी अवस्थेतील वर्षाला त्यांनी खैरलांजी येथील रुग्णालयात नेले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती तिला मृत घोषित केले. प्राथमिक अंदाजानुसार, तिचा मृत्यू घटनास्थळीच झाला असावा. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच दवनीवाडा पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. याप्रकरणी दवनीवाडा पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला असून तपासाला सुरुवात केली आहे.

थोडक्यात

उत्तर काश्मीरमध्ये तीन हँड ग्रेनेड निकामी

बारामुल्ला : जम्मू-काश्मीरमधील उत्तर काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यातील दुरहामा परिसरात सुरक्षा दलांनी तीन हँड ग्रेनेड निकामी केले आहेत. एका प्लास्टिकच्या पिशवीत हे ग्रेनेड आढळून आले होते. सोमवारी अधिकाऱ्यांच्या हवाल्याने ही माहिती दिली. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच बारामुल्ला पोलिसांनी तंगमर्ग येथील बदरकूट जंगल परिसरातून दोन हँड ग्रेनेड जप्त केले होते. या प्रकरणी गुलाम जिलानी रेशी याला अटक करण्यात आली होती. तो तंगमर्गमधील बदरकोट गावाचा रहिवासी आहे. बारामुल्ला पोलिसांनी सीआयसीटी एफटीआर बीएसएफ, २ आरआर आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) जवानांच्या समन्वयाने जंगल परिसरात शोधमोहीम राबवली होती. या मोहिमेदरम्यान परिसरात गस्त घालत असताना गुलाम जिलानी रेशीकडून एक हँड ग्रेनेड जप्त करण्यात आला. त्याची चौकशी केली असता त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे सुरक्षा दलांनी जंगलात लपवून ठेवलेला आणखी एक हँड ग्रेनेड हस्तगत केला.

या प्रकरणी तंगमर्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेली स्फोटके कुठून आणण्यात आली, त्यांचा वापर कशासाठी केला जाणार होता आणि या प्रकरणामागे अन्य कोणाचे संबंध आहेत का, याचा तपास पोलिस करत आहेत. बारामुल्ला पोलिसांनी परिसरात शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठी आपली कटिबद्धता पुन्हा व्यक्त केली आहे. तसेच या कारवाईत सहभागी झालेल्या सर्व सुरक्षा दलांच्या समन्वित प्रयत्नांचे कौतुक केले आहे.

थायलंडमधील फुकेत येथे आग

फुकेत : थायलंडच्या दक्षिणेकडील प्रसिद्ध पर्यटन बेट असलेल्या फुकेत येथे सोमवारी पहाटे एका व्यावसायिक इमारतीला लागलेल्या भीषण आगीत ११ जणांचा मृत्यू झाला असून १६ जण जखमी झाले आहेत. पहाटे ३:१७ च्या सुमारास एका वाहन भाड्याने देणाऱ्या (व्हेईकल रेंटल) दुकानाच्या इमारतीतून आगीला सुरुवात झाली आणि पाहता पाहता ती आजूबाजूच्या इतर इमारतींमध्ये पसरली.

स्थानिक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अग्निशमन दलाच्या जवानांना या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सुमारे दोन तास लागले. ही इमारत फुकेतच्या पश्चिम किनाऱ्यावरील प्रसिद्ध पातोंग समुद्रकिनाऱ्याजवळील नागरी भागात आहे.

विहिरीच्या कठड्याचे बांधकाम करताना २ कामगारांचा मृत्यू

वाशिम : सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील आंबे गावात विहिरीचा कठडा कोसळून चार मजुरांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच, आता वाशिम जिल्ह्यातूनही अशीच एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. वाशिम जिल्ह्यातील जवळा कुंभार शेतशिवारात नवीन विहिरीचे बांधकाम सुरू असताना मातीचा कडा कोसळून दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. हळदीचे पीक वाचवण्यासाठी संबंधित शेतमालकाने आपल्या शेतात नवीन विहीर खोदण्याचे आणि बांधण्याचे काम सुरू केले होते. विहिरीच्या कठड्याच्या बांधकामासाठी बाजूने मुरूम टाकण्याचे काम सुरू असताना अचानक मातीचा भाग ढासळला. यावेळी तिथे काम करत असलेल्या एका मजुराचा तोल जाऊन तो थेट खोल विहिरीत कोसळला. आपल्या सहका-याला पाण्यात बुडताना पाहून दुस-या मजुराने क्षणाचाही विलंब न करता त्याला वाचवण्यासाठी विहिरीत उडी घेतली. मात्र, विहीर खूप खोल असल्याने आणि पाण्याचा अंदाज न आल्याने दोघांचाही दुर्दैवाने पाण्यात बुडून मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेत संतोष जामनिगके आणि वासुदेव धोंगडे या दोन कष्टकरी मजुरांचा जीव गेला आहे.

मौदा व धानोली येथील वाहन काट्यांच्या पडताळणी-मुद्रांकनाचा प्रश्न दोन-तीन वर्षांपासून प्रलंबित!

राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या आणि महाराष्ट्र शासनाच्या आदेशालाही केराची टोपली? कामठी-२ विभागाच्या निरीक्षकांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह; सहनियंत्रकांच्या भूमिकेवरही संताप

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कृषी उत्पन्न बाजार समिती मौदा तसेच धानोली परिसरातील राईस मिल यांनी मागील दोन ते तीन वर्षांपूर्वी एका उत्पादकाकडून वाहन काटे (वेब्रिज) खरेदी केले आहेत. सदर वाहन काट्यांची वैध मापनशास्त्र कायद्यानुसार पडताळणी व मुद्रांकन करून घेण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे आणि नियमांनुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून संबंधित विभागाकडे सादर करण्यात आली होती. मात्र, नागपूर विभागातील कामठी-२ कार्यालयाकडून कोणतेही ठोस आणि समाधानकारक कारण न देता वारंवार अर्ज नाकारण्यात आल्याचा गंभीर आरोप संबंधित उत्पादकाकडून करण्यात येत आहे.

या प्रकरणात संबंधित उत्पादकाने अखेर महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोगाकडे तक्रार दाखल केली. या तक्रारीची दखल घेत आयोगाने आदेश पारित केले. त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या संबंधित सचिव कार्यालयाकडूनही नियमानुसार तातडीने पडताळणी व मुद्रांकन करून आवश्यक कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आल्याचे सांगण्यात येते. मात्र, शासनस्तरावरून निर्देश प्राप्त होऊनही आजपर्यंत प्रत्यक्ष कार्यवाही झालेली नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

राज्य आयोगाच्या आदेशानंतरही कार्यवाही का नाही?

राज्य लोकसेवा हक्क आयोग आणि शासनाच्या निदेशानंतरही संबंधित वाहन काट्यांची पडताळणी व मुद्रांकन रखडलेले असेल, तर यामागचे नेमके कारण काय? संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक विलंब केला जात आहे का? नियमांची पूर्तता करूनही अर्ज वारंवार नाकारण्यामागे काही वेगळा हेतू आहे का? आर्थिक हितसंबंध किंवा भ्रष्टाचाराच्या संशयाला वाव निर्माण करणारी परिस्थिती तर निर्माण होत नाही ना? असे अनेक प्रश्न परवानाधारक व्यावसायिक आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून उपस्थित केले जात आहेत. या सर्व बाबींची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असून, कोणत्याही अधिकाऱ्याला दोषी ठरविण्यापूर्वी त्याची बाजू ऐकून घेऊन उपलब्ध कागदपत्रे आणि पुराव्यांच्या आधारे सत्य परिस्थिती समोर आणणे गरजेचे आहे.

कामठी-२ निरीक्षकांच्या कार्यपद्धतीवर वापूहीही प्रश्नचिन्ह ?

या प्रकरणाला आणखी एक गंभीर पार्श्वभूमी असल्याचा दावा परवानाधारकांकडून करण्यात येत आहे. कामठी-२ विभागातील संबंधित निरीक्षकांच्या कामकाजाबाबत यापूर्वीही अनियमितता आणि नियमबाह्य कार्यपद्धतीचे आरोप झाले होते. या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात आली असून, चौकशी अहवालात काही बाबी निष्पन्न झाल्याचे संबंधित परवानाधारकांचे म्हणणे आहे. असे असताना संबंधित निरीक्षकांना ग्रामीण उपनियंत्रकाचा अतिरिक्त पदभार कोणत्या निकषांवर देण्यात आला? त्यांच्या पूर्वीच्या कामकाजाबाबत चौकशी अहवाल उपलब्ध असताना त्यांच्यावर पुन्हा महत्त्वाची प्रशासकीय जबाबदारी सोपविण्यामागे प्रशासनाची भूमिका काय? या नियुक्तीचा किंवा पदभार देण्याचा निर्णय कोणत्या आधारावर घेण्यात आला? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

वाहन काट्यांच्या पडताळणी-मुद्रांकन प्रक्रियेचीही सखोल चौकशी व्हावी

परवानाधारक आणि संबंधित संघटनेने कामठी-२ कार्यालयाच्या मागील कामकाजाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. विशेषतः या कार्यालयामार्फत मागील काही वर्षांत करण्यात आलेल्या वाहन काट्यांच्या पडताळणी व मुद्रांकन प्रक्रियेची तपासणी करावी, अशी मागणी पुढे आली आहे.

वाहन काट्यांची पडताळणी कोणत्या पद्धतीने करण्यात आली? कायद्याने निर्धारित केलेल्या प्रक्रिया आणि तांत्रिक निकषांचे पालन झाले का? आवश्यक उपकरणे आणि प्रमाणित वजनांचा वापर करण्यात आला का? संबंधित नोंदी, अहवाल आणि मुद्रांकन प्रक्रियेत पारदर्शकता होती का? तसेच अर्जदारांच्या अर्जांवर निर्णय घेताना समान निकष लागू करण्यात आले का? या सर्व बाबींची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

या संदर्भातील तपासणी अहवाल, कथित नियमबाह्य कामकाजाचे पुरावे आणि संबंधित कागदपत्रे यापूर्वीच सहनियंत्रक तसेच नियंत्रक कार्यालयाकडे सादर केल्याचा दावा संघटनेकडून करण्यात येत आहे. तरीदेखील संबंधित कार्यालयाच्या कामकाजात अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

शेतकरी आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांना नाहक त्रास

वाहन काटे हे कृषी उत्पन्न बाजार समित्या, राईस मिल आणि शेतमालाच्या खरेदी-विक्री व्यवहारांसाठी अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. वाहन काट्यांची वेळेत पडताळणी व मुद्रांकन न झाल्यास त्याचा थेट परिणाम व्यवहारांवर होऊ शकतो. परिणामी बाजार समित्या, व्यापारी, उत्पादक आणि शेतकऱ्यांना आर्थिक व प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागू शकतो. शासनाच्या नियमानुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही संबंधितांना वर्षानुवर्षे कार्यालयीन फेऱ्या माराव्या लागत असतील, तर ही बाब केवळ एका उत्पादकाची समस्या राहत नाही, तर संपूर्ण प्रशासकीय व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

संघटना आक्रमक; उच्च न्यायालयात दाद मागण्याची तयारी

या संपूर्ण प्रकरणात संबंधित परवानाधारक आणि संघटनेने आता आक्रमक भूमिका घेतली आहे. शासनाच्या आदेशानंतरही कार्यवाही होत नसल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या जबाबदारीची निश्चिती करून त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच संबंधित निरीक्षकांच्या कार्यकाळातील कामकाजाची विशेष चौकशी करून वाहन काट्यांच्या पडताळणी व मुद्रांकनातील सर्व नोंदी तपासण्यात याव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे. याप्रकरणी संघटनेच्या वतीने उच्च न्यायालयात दाद मागण्याची तयारी सुरू असल्याचे समजते.

शासन आणि वरिष्ठ अधिकारी कोणती भूमिका घेणार ?

या प्रकरणामुळे नागपूर विभागातील वैध मापनशास्त्र विभागाच्या प्रशासकीय कार्यपद्धतीबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. एका बाजूला शासन पारदर्शक प्रशासन आणि नागरिकांना वेळेत सेवा देण्याची हमी देते, तर दुसऱ्या बाजूला राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या आदेशानंतरही संबंधित काम प्रलंबित राहत असेल, तर याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

आता महाराष्ट्र शासनाचे सचिव, वैध मापनशास्त्र विभागाचे नियंत्रक आणि नागपूर विभागाचे सहनियंत्रक या प्रकरणात कोणती भूमिका घेतात, संबंधित अर्जदारांना न्याय कधी मिळतो आणि कामठी-२ कार्यालयाच्या कार्यपद्धतीची निष्पक्ष चौकशी कधी होते, याकडे संपूर्ण परवानाधारक वर्ग, संघटना तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे लक्ष लागले आहे.

प्रश्न एवढाच आहे की, नियमांची पूर्तता करणाऱ्या नागरिक आणि व्यावसायिकांना वेळेत शासकीय सेवा मिळणार कधी? शासन आणि आयोगाच्या आदेशांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी आणखी किती तक्रारी आणि न्यायालयीन लढाया कराव्या लागणार?

संपादकीय लेखणीतून...

दुधाची दरवाढ

सर्वसामान्यांच्या खिशाला पुन्हा महागाईची झळ बसली आहे. मदर डेअरीने आपल्या विविध प्रकारच्या दुधाच्या दरात प्रती लिटर २ ते ४ रुपयांची वाढ जाहीर केली आहे. त्याचप्रमाणे अमूल ब्रँडचे संचलन करणाऱ्या गुजरात को-ऑप. मिल्क मार्केटिंग फेडरेशनेही ताज्या पाऊच दुधाच्या दरात प्रती लिटर २ ते ४ रुपयांची वाढ जाहीर केली आहे. ही दरवाढ त्वरित म्हणजे १२ नोव्हेंबरपासून लागू झाली आहे. दूध खरेदीसाठी शेतकऱ्यांना द्याव्या लागणाऱ्या वाढीव किमती आणि उत्पादन खर्चात झालेली वाढ यामुळे कंपनीने वाढीव खर्च अंशतः ग्राहकांकडून वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनी आपल्या दूध विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नापैकी ७५ ते ८० टक्के हिस्सा शेतकऱ्यांना देते. मदर डेअरीची दिल्ली-एनसीआरमध्ये दररोज सुमारे ३५ लाख लिटर दुधाची विक्री होते तर देशभरातील दैनंदिन विक्री ५० लाख लिटरपेक्षा अधिक आहे. आधीच वाढत्या महागाईमुळे त्रस्त झालेल्या ग्राहकांना आता दूध खरेदीसाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि. अर्थात कात्रज डेअरीने दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार कात्रजच्या दुधाच्या दरात प्रती लिटर ४ रुपयांची वाढ करण्यात आली. १६ नोव्हेंबरपासून ही दरवाढ लागू झाली आहे. कात्रज डेअरीच्या दूध उत्पादक आणि व्यावसायिक संचाच्या बैठकीतून दरवाढीचा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयामुळे ६२ रुपये प्रती लिटर दराने मिळणारे कात्रजचे दूध आता ६६ रुपये प्रती लिटर दराने मिळणार आहे म्हणजे ग्राहकांना प्रत्येक लिटरमागे ४ रुपये अधिक मोजावे लागणार आहेत. दूध उत्पादक शेतकऱ्यांना मिळणारा दूध खरेदीचा भाव आणि ग्राहकांना किरकोळ विक्रीसाठी आकारला जाणारा भाव यांच्यातील वाढती तफावत हे दरवाढीमागील महत्त्वाचे कारण असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याच बरोबर पशुखाद्य, वाहतूक, प्रक्रिया आणि उत्पादनाशी संबंधित इतर खर्चातही वाढ होत आहे. या वाढत्या खर्चामुळे डेअरी व्यवसायावरील आर्थिक दबाव वाढत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे दुधाच्या दरवाढीने केवळ दूधच महागणार नाही तर दुग्धजन्य पदार्थही महागणार आहेत. दूध दर वाढल्याने दुग्धजन्य पदार्थांच्या किमतीत किमान १० टक्के वाढ होणे अटळ आहे. यामुळे दही, ताक, पनीर आणि अन्य दुग्धजन्य पदार्थांसाठी आता अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. मदर डेअरी, अमूल पाठोपाठ गोकुळ दुधाच्या दरातही वाढीचे संकेत देण्यात आले आहेत. वाढत्या महागाईने त्रस्त झालेल्या सर्वसामान्यांना दूध दरवाढीलाही सामोरे जावे लागत आहे. राज्यातील दूध उत्पादक व व्यावसायिक कल्याणकारी संघाच्या बैठकीत गाय आणि म्हशीच्या दुधात प्रती लिटर ४ रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

११ ऑगस्टला संघटनेने दुधाच्या विक्री दरात प्रती लिटर २ रुपयांनी वाढ केली होती. आता एकदम प्रती लिटर ४ रुपयांच्या वाढीला सरकारची संमती आहे का? दूध दर वाढीवर कोणाचे नियंत्रण आहे की नाही? या दरवाढीतील किती पैसे शेतकऱ्याला मिळणार आहेत? दुधातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईनंतर दूध संकलनात दररोज काही लाख लिटरची घट झाली आहे. याचा परिणाम दूधाच्या दरवाढीवर झाला आहे का? असे अनेक प्रश्न भेडसावत आहेत. देशात एकेकाळी दुधाची कमतरता होती. ती भरून काढण्यासाठी १९७० च्या दशकात ऑपरेशन फ्लड हाती घेण्यात आले. यातून भारतात दूध क्रांती होऊन तो जगातील पहिल्या क्रमांकाचा दूध उत्पादक देश बनला. आता दूध दरवाढीची क्रांती देशात होऊ लागली आहे.

प्रत्येक कुटुंबाचा पोषणासाठी आवश्यक असलेल्या दुधाचे दर सर्वसामान्यांना चक्रावून टाकत आहेत त्यामुळे सरकारने मुक्याची भूमिका न घेता दूध दरवाढीत हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांकडून कंपन्या ५० ते ५५ रुपये लिटरचे कच्चे दूध खरेदी करतात. त्या दूधावर प्रक्रिया करून दही, तूप, लोणी, चीज, बटर, ताक, दुधाची भुकटी, पनीर, योगार्ट, आईस्क्रीम, मिठाई आदी पदार्थ बनवतात. आपला खर्च वजा करून चांगला नफा कमावतात तरीही गत ५ वर्षात दुधाच्या दरात सातत्याने वाढ होताना दिसत आहे. देशातील बड्या कंपन्यांनी १२ नोव्हेंबरपासून दूध दरात २ ते ४ रुपयांनी लिटरमागे वाढ केली. अमूल आणि मदर डेअरीने मे २०२६ मध्ये दूध दरात वाढ केली होती. त्यानंतर अवघ्या ६ महिन्यात त्यांनी पुन्हा दूध दरवाढ केली आहे त्यामुळे आता सरकारने दूध दरांवर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक बनले आहे.

एका क्लिकच्या जगात अचानक आलेला डिजिटल अंधार

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

आजच्या एकविसाव्या शतकातील आधुनिक जगात आपला दिवस सुरू होतो तो मुळी लॅपटॉपच्या स्क्रीनवर आणि मोबाईलच्या नोटिफिकेशन्सवर. इंटरनेट, 'क्लाउड' आणि 'डिजिटल सिस्टीम' या आता केवळ आपल्या सोयीच्या वस्तू राहिलेल्या नाहीत, तर त्या आपल्या कॉर्पोरेट, प्रशासकीय आणि वैयक्तिक जीवनाचा कणा बनल्या आहेत. पण क्षणभर विचार करा, जर अचानक या डिजिटल जगाचा श्वासच काही काळासाठी कोंडला गेला तर काय होईल?

काल रात्री जगभरातील लाखो युजर्सनी नेमका हाच थरारक आणि तितकाच गोंधळात टाकणारा अनुभव घेतला. 'मायक्रोसॉफ्ट' या जगातील सर्वात मोठ्या तंत्रज्ञान कंपनीच्या सेवांमध्ये अचानक मोठा तांत्रिक बिघाड झाला आणि जगभरातील कॉर्पोरेट जगताचे चक्र काही काळासाठी पूर्णपणे ठप्प झाले. या समस्येने संपूर्ण जगाला काही काळासाठी स्तब्ध करून सोडले. १३ नोव्हेंबरला अचानक मायक्रोसॉफ्ट ३६५, आउटलुक, टीम्स, कोणायलट आणि इतर अनेक महत्त्वाचे ॲप्स काम करेनासे झाले. आधुनिक कार्यालयांचे कामकाज या ॲप्सवरच चालते. त्यामुळे अनेकांना ईमेल्स पाठवता आले नाहीत, काहींच्या महत्त्वाच्या आणि तातडीच्या मीटिंग्स अचानक रद्द कराव्या लागल्या, फाईल्सची देवाणघेवाण थांबली, तर काहींना साधे आपले अकाऊंट लॉग-इन करणेही अशक्य झाले. जगातील कोट्यवधी कर्मचारी काम करत असताना अचानक स्क्रीनवर 'एरर' दिसू लागल्याने जगभरातील कार्यालयांमध्ये एकच गोंधळ उडाला.

सायबर हल्ला की तांत्रिक चूक?

एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर जागतिक सिस्टीम डाऊन झाल्याने सुरुवातीला हा एखादा मोठा 'सायबर हल्ला' असावा किंवा जाणीवपूर्वक केलेला कट असावा, अशी भीती व्यक्त केली जात होती. परंतु, मायक्रोसॉफ्टने तातडीने खुलासा करत ही केवळ एक तांत्रिक अडचण असल्याचे स्पष्ट केले. प्रत्यक्षात घडले असे होते की, मायक्रोसॉफ्ट्याच्या जागतिक इन्फ्रास्ट्रक्चरमधील काही मुख्य सर्व्हर्स अचानक ऑफलाईन गेले. यामुळे जे सर्व्हर्स चालू होते, त्यांच्यावर जगभरातील युजर्सच्या ट्रॅफिकचा प्रचंड ताण आला. नेटवर्क क्षमतेपेक्षा अनेक पटींनी जास्त विनंत्या (डेटा रिक्वेस्ट्स) आल्याने चालू सर्व्हर्सही क्रॅश झाले. ही एक प्रकारची साखळी प्रक्रिया होती, जिने एका झटक्यात जागतिक नेटवर्क खिळखिळे केले आणि डिजिटल महामार्गावर अभूतपूर्व अशी वाहतूक कोंडी निर्माण केली.

या तांत्रिक बिघाडाची व्यापी प्रचंड मोठी होती. अमेरिका, ब्रिटन, जपान, ऑस्ट्रेलिया ते भारतापर्यंत सर्वांनाच याचा मोठा फटका बसला. ब्रिटनमधील राष्ट्रीय आरोग्य सेवा, शाळा, पोलिसांचे कामकाज तसेच जपानमधील सरकारी कार्यालये यांच्या दैनंदिन कामकाजात मोठे अडथळे निर्माण झाले. 'डाऊनडिटेक्टर' या ट्रॅकिंग वेबसाईटवर एकाच वेळी एक लाख तीस हजारांहून अधिक तक्रारींची नोंद झाली, यावरून समस्येची तीव्रता आणि जागतिक व्याप्ती लक्षात येते. केवळ आयटी क्षेत्रच नाही, तर बँकिंग, रिटेल आणि आरोग्य क्षेत्रालाही याचा फटका बसला.

भारतातही याचे अतिशय गंभीर परिणाम दिसले. पुणे, बंगळूरू, हैदराबाद आणि गुरुग्रामसारख्या आयटी हबमधील लाखो कर्मचाऱ्यांचे कामकाज थांबले. अनेक कंपन्यांना आपल्या कर्मचाऱ्यांना लवकर घरी पाठवावे लागले. विशेषतः विमान वाहतुकीला याचा मोठा फटका बसला. इंडिगो आणि अकासा एअर यांसारख्या विमान कंपन्यांचे कस्टमर सपोर्ट, तिकीट बुकिंग, बोर्डिंग पास देणे आणि संपकार्चे कामकाज विस्कळीत झाले. विमानतळांवर प्रवाशांची मोठी गर्दी आणि गोंधळ पाहायला मिळाला. सुदैवाने, एअर इंडियासारख्या काही संस्थांनी तातडीने पर्यायी मार्गांचा अवलंब केल्याने मोठा अनर्थ टळला.

बिघाड लक्षात येताच मायक्रोसॉफ्ट्या जगभरातील अभियंत्यांनी युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम हाती घेतले. सुरुवातीला बंद पडलेले सर्व्हर्स पुन्हा सुरू करण्याचे प्रयत्न करण्यात आले. मात्र, सर्व्हर सुरू होताच त्यावर अचानक जगभरातील साठलेला ट्रॅफिक एकदम यायचा आणि ते सर्व्हर्स पुन्हा प्रतिसाद देणे बंद करायचे. अखेर, नेटवर्क कॉन्फिगरेशनमध्ये अत्यंत सावधगिरीने बदल करून आणि ट्रॅफिकवर टप्प्याटप्प्याने मर्यादा आणून कंपनीने हळूहळू सेवा पूर्ववत करण्यास सुरुवात केली. पूर्णपणे सेवा सुरळीत होण्यासाठी त्यांना अनेक तासांची शर्थ करावी लागली.

या घटनेतून आपण नेमके काय शिकलो?

मायक्रोसॉफ्टचा हा बिघाड केवळ एक तांत्रिक अडचण नव्हती, तर तो आपल्या सर्वांसाठी आणि जागतिक व्यवस्थेसाठी एक अत्यंत महत्त्वाचा धडा होता. आज आपण 'क्लाउड कम्प्युटिंग' आणि मूठभर जागतिक टेक कंपन्यांच्या सर्व्हर्सवर किती मोठ्या प्रमाणावर आणि आंधळेपणाने अवलंबून आहोत, हे या घटनेने लख्खपणे दाखवून दिले.

डिजिटल क्रांतीने आपले जीवन सोपे नक्कीच केले आहे, भौगोलिक सीमा ओलांडून जग जवळ आणले आहे आणि कामाचा वेग अनेक पटींनी वाढवला आहे; परंतु जेव्हा हीच सिस्टीम कोलमडते, तेव्हा संपूर्ण जग कसे असहाय्य आणि हतबल होते, याची धडकी भरवणारी जाणीव कालच्या घटनेने करून दिली. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी किंवा त्यांचे वाईट परिणाम कमी करण्यासाठी केवळ एकाच सिस्टीमवर किंवा कंपनीवर अवलंबून न राहता, संस्था आणि सरकारांनी भक्कम 'बॅकअप' आणि 'पर्यायी' यंत्रणा उभारणे ही आता काळाची अत्यंत तातडीची गरज बनली आहे.

तंत्रज्ञानावर विसंबून राहतानाच, तंत्रज्ञान निकामी ठरल्यास आपले कामकाज कसे चालू राहील, यावर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता आली आहे. हा डिजिटल अंधार आपल्याला सावध करण्यासाठी आलेला एक इशारा आहे, हे आपण वेळीच ओळखायला हवे.

मायक्रोसॉफ्टच्या या जागतिक आऊटेजने एक महत्त्वाचे वास्तव पुन्हा अधोरेखित केले आहे की, डिजिटल तंत्रज्ञान जितके शक्तिशाली आहे, तितकेच त्यावरचे अतिअवलंबित्व धोकादायकही ठरू शकते. एका मोठ्या तांत्रिक बिघाडामुळे कार्यालये, बँकिंग, आरोग्यसेवा, विमान वाहतूक आणि दैनंदिन व्यवहारांवर किती व्यापक परिणाम होऊ शकतो, याचा अनुभव जगाने घेतला. त्यामुळे केवळ अत्याधुनिक तंत्रज्ञान स्वीकारणे पुरेसे नाही, तर त्याच्या अपयशाच्या परिस्थितीत कामकाज सुरळीत ठेवण्यासाठी सक्षम बॅकअप, पर्यायी व्यवस्था आणि आपत्कालीन नियोजन असणेही तितकेच आवश्यक आहे. डिजिटल युगाने जगाला वेग दिला आहे; पण या वेगामागे असलेली तांत्रिक असुरक्षितता विसरून चालणार नाही. एका कंपनीवर किंवा एका डिजिटल प्रणालीवर पूर्णपणे अवलंबून राहण्याऐवजी विविध पर्यायांची मजबूत व्यवस्था उभारणे, सायबर आणि तांत्रिक सुरक्षेला प्राधान्य देणे आणि संकटाच्या वेळी मानवी हस्तक्षेपाची क्षमता कायम ठेवणे, ही काळाची गरज आहे.

म्हणूनच, मायक्रोसॉफ्टचा हा आऊटेज केवळ काही तासांचा तांत्रिक बिघाड नव्हता; तो डिजिटल जगाला सावध करणारा एक गंभीर इशारा होता. तंत्रज्ञानाचा स्वीकार जरूर करूया, पण त्यावर आंधळेपणाने अवलंबून न राहता 'पर्याय आणि तयारी' हीच डिजिटल भविष्याची खरी सुरक्षा आहे.

- ९५६१५९४३०६

वेगाची बेफिकीरी, आयुष्यभराच्या वेदना

शशिकांत म.तोटे
दारव्हा,जि.यवतमाळ

रस्ते हे विकासाचे मार्ग असले,तरी त्याच रस्त्यांवर दररोज निष्पाप माणसांचे बळी जात असतील; तर विकासाच्या संकल्पनेचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. वाहनांची वाढती संख्या,वेगाची बेफिकिरी आणि वाहतुकीच्या नियमांकडे होणारे दुर्लक्ष आणि गुणवत्तापूर्ण रस्त्याचा अभाव यामुळे रस्ते अपघातांची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या वृत्तपत्रांतील बातम्या या वास्तवाचे भयावह चित्र समोर आणणारे आहे.

बातमीनुसार, महाराष्ट्रात जानेवारी ते जुलै २०२६ या सात महिन्यांत तब्बल २९ हजार ४४७ रस्ते अपघातांची नोंद झाली असून, त्यामध्ये ९ हजार ११५ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.म्हणजेच राज्यात दररोज सरासरी ४३ जणांचा रस्ते अपघातात मृत्यू होत आहे.मागील वर्षाच्या तुलनेत अपघाती मृत्यूंच्या संख्येत घट झाली असली,तरी मृत्यूचा हा आकडा निश्चितच चिंताजनक आहे.

समृद्ध महामार्गावर झालेल्या भयावह अपघाताची घटना ताजी असतानाच, आसाममधील काझीरंगा येथील भीषण अपघाताने संपूर्ण देशाचे लक्ष वेधले आहे.ट्रक आणि प्रवासी भरलेल्या टेम्पो ट्रॅव्हलरची समोरासमोर धडक होऊन २३ जणांचा मृत्यू झाला.मात्र अपघातांचे गांभीर्य केवळ मृतांच्या आकड्यांपुरते मर्यादित नाही.

अपघातातून बचावलेल्या अनेकांना गंभीर शारीरिक दुखापतींचा सामना करावा लागतो. डोक्याला आणि मेंदूला झालेल्या दुखापती, मणक्याचे फ्रॅक्चर,हात-पाय निकामी होणे, अंतर्गत रक्तस्राव, अवयवांना इजा आणि कायमचे अपंगत्व यामुळे अनेकांचे आयुष्य बदलून जाते. काहींना चालणे, बोलणे किंवा स्वतःची दैनंदिन कामे करणेही अशक्य होते. दीर्घकाळ उपचार, शस्त्रक्रिया आणि पुनर्वसन यासाठी मोठा खर्च करावा लागतो.परिणामी अपघातग्रस्त व्यक्तीसोबत संपूर्ण कुटुंब शारीरिक, मानसिक आणि आर्थिक संकटात सापडते. दैनंदिन होणाऱ्या अपघातांच्या श्रृंखलेमागे अपघातांची प्रमुख कारणामध्ये वेगमर्यादेचे उल्लंघन, बेदरकार वाहनचालक,मद्यपान करून वाहन चालविणे,वाहन चालविताना मोबाईलचा वापर, सुरक्षित अंतर न राखणे आणि वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करणे.

रस्ते अपघात रोखण्यासाठी केवळ दंडात्मक कारवाई पुरेशी नाही. वेगमर्यादेची कठोर अंमलबजावणी, नियमित वाहन तपासणी,मद्यपी चालकांवर कारवाई, महामार्गावरील सीसीटीव्ही व्यवस्था, धोकादायक ठिकाणांची सुधारणा आणि अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय मदत मिळण्यायची यंत्रणा सक्षम करावी लागेल. रस्ते अपघातात एखादा जीव जातो तेव्हा केवळ एक व्यक्ती संपत नाही,तर एका कुटुंबाचा आधार,स्वप्न आणि भविष्यही उद्ध्वस्त होते. तर बचावलेल्या व्यक्तीचे आयुष्यही कायमच्या शारीरिक व्याधी आणि परावलंबित्वाच्या विळख्यात अडकू शकते.त्यामुळे वेगापेक्षा जीव महत्त्वाचा आणि घाईपेक्षा सुरक्षितता मोठी आहे,ही जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. रस्ते मृत्यूचे सापळे न बनता सुरक्षित प्रवासाचे माध्यम व्हावेत,यासाठी शासनासोबतच प्रत्येक नागरिकानेही जबाबदारी स्वीकारण्याची गरज आहे.

- ९१३०८३५४५८

शेवटच्या चेंडूवर पाकिस्तानचं गर्वहरण! मोहित उल्वाचा चौकार अन् भारताचा नववा आशिया मुकुट; पाकिस्तानच्या मैदानाबाहेरील व मैदानावरील चुका पुन्हा उघड्या!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

क्रिकेट हा केवळ धावा, बळी आणि विजय-पराजयाचा खेळ नाही, तर तो संयम, जिद्द, आत्मविश्वास आणि खिलाडूवृत्तीची कसोटी पाहणारा खेळ आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील १९ वर्षांखालील आशिया चषकाचा अंतिम सामना म्हणजे या विधानाचा प्रत्यय देणारा अविस्मरणीय क्रिकेटपट होता. विजय जवळजवळ हातात आल्याचा आनंद साजरा करण्याच्या तयारीत असलेल्या पाकिस्तानला भारतीय युवा शिलेदारांनी शेवटच्या चेंडूवर असा धक्का दिला की, त्यांचे विजेतेपदाचे स्वप्न धुळीस मिळाले. दहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या मोहित उल्वाने शेवटच्या चेंडूवर मारलेला चौकार हा केवळ भारताच्या विजयाचा चौकार नव्हता, तर भारतीय क्रिकेटच्या जिद्दीचा आणि आत्मविश्वासाचा ऐतिहासिक हुंकार होता!

१४ नोव्हेंबर २०२६ रोजी ओमानमधील अल अमेरात येथे झालेल्या या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा एका गडीने पराभव करून १९ वर्षांखालील आशिया चषकावर विक्रमी नवव्यांदा आपले नाव कोरले. पाकिस्तानने उभारलेली ३३८ धावांची भलीमोठी भिंत भारताने शेवटच्या चेंडूवर ओलांडली. भारताने ५० षटकांत ९ बाद ३३९ धावा केल्या. विशेष म्हणजे, ४२व्या षटकात २५२ धावांवर आठ गडी बाद झाल्यानंतर भारताचा पराभव जवळजवळ निश्चित मानला जात होता. मात्र, क्रिकेटमध्ये शेवटचा चेंडू टाकला जाईपर्यंत सामना संपत नसतो, हे भारतीय युवा खेळाडूंनी सिद्ध करून दाखविले.

पराभवाच्या दारातून विजयाचा शिखरावर!

भारताच्या डावाची सुरुवात कर्णधार लक्ष्य रायचंदानी आणि आर्यवीर सेहवाग यांनी अत्यंत आत्मविश्वासाने केली. दोघांनी पहिल्या गड्यासाठी ९५ धावांची भागीदारी केली. सेहवागने ५८ धावा केल्या, तर लक्ष्यने ८० धावांची कर्णधाराला साजेशी खेळी साकारली. मात्र, या दोघांच्या माघारीनंतर भारतीय फलंदाजीला गळती लागली. मधल्या फळीतील फलंदाजांनी अपेक्षित जबाबदारी पार न पाडल्यामुळे भारताची अवस्था २५२ धावांत आठ बाद अशी झाली. पाकिस्तानच्या खेळाडूंचा आत्मविश्वास वाढला आणि भारतीय संघाचा पराभवाची चर्चा सुरू झाली.

परंतु संकटाच्या काळातच खऱ्या लढवय्यांची ओळख होते. मनाल चौहान आणि मोहित उल्वा यांनी हीच गोष्ट सिद्ध केली. नवव्या गड्यासाठी या दोघांनी अवघ्या ३५ चेंडूंत ५७ धावांची झंझावाती भागीदारी केली. मनालने ३२ चेंडूंत ४७ धावा करताना आक्रमक फलंदाजी आणि



संयम यांचा सुंदर मिलाफ घडवला. दुसऱ्या बाजूला मोहितने पाकिस्तानी गोलंदाजांवर हल्ला चढवला.

भारताचा युवा सलामीवीर आर्यवीर सेहवाग याने संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण फलंदाजी केली. त्याने पाच सामन्यांत ३६१ धावा करून स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होण्याचा मान मिळवला. त्याला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार देण्यात आला. विशेष म्हणजे तो भारताचा माजी स्फोटक सलामीवीर वीरेंद्र सेहवाग याचा मुलगा आहे. वडिलांच्या आक्रमक फलंदाजीचा वारसा पुढे नेण्याची क्षमता त्याच्यात दिसून आली.

भारताचा माजी कर्णधार राहुल द्रविड याचा मुलगा अन्वय द्रविड यालाही या संघात स्थान मिळाले होते. मात्र, त्याला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. पाच सामन्यांत तीन डावांत त्याने केवळ ४१ धावा केल्या. त्याची सर्वोच्च धावसंख्या १९ होती. दुसरीकडे भारताच्या ईशान सूदने चार सामन्यांत ११ बळी मिळवून गोलंदाजीत छाप पाडली. अफगाणिस्तानच्या नूर अलीने चार सामन्यांत १४ बळी मिळवून स्पर्धेत सर्वाधिक बळी घेण्याचा मान मिळवला.

भारतीय युवा क्रिकेटचे उज्ज्वल भविष्य!

या स्पर्धेतील भारतीय संघाच्या कामगिरीचा विचार केला तर अंतिम सामन्यातील विजय हा केवळ एका सामन्याचा निकाल नाही. तो भारतीय क्रिकेटच्या मजबूत वयोगट व्यवस्थेचा आणि प्रतिभावान खेळाडूंच्या उपलब्धतेचा पुरावा आहे. लक्ष्य रायचंदानीचे नेतृत्व, आर्यवीर सेहवागची फलंदाजी, मनाल चौहानचा संघर्ष, मोहित उल्वाची आक्रमकता, चिगुरुपती व्यंकटची निर्णायक साथ आणि काव्या पटेलची प्रभावी गोलंदाजी या सर्वांनी भारताच्या विजयात आपापले योगदान दिले.

पाकिस्तानने मागील स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताचा १९१ धावांनी पराभव करून विजेतेपद पटकावले होते. यंदा मात्र भारतीय संघाने त्याच प्रतिस्पर्ध्यांना त्यांच्याच विजेतेपदाच्या बचावात पराभूत करून हिशेब चुकता केला. साखळी सामन्यात पाकिस्तानकडून झालेल्या पराभवाचेही भारताने अंतिम सामन्यात विजयात रूपांतर केले. भारताने या स्पर्धेत नवव्यांदा विजेतेपद मिळवून आशियाई युवा क्रिकेटमधील आपले वर्चस्व पुन्हा सिद्ध केले. विशेष म्हणजे, भारताचा हा २०२१ नंतरचा पहिला आशिया चषक विजय होता.

शेवटचा चौकार पाकिस्तानला कायम लक्षात राहील!

३३८ धावांचे लक्ष्य, आठ बाद २५२ अशी बिकट अवस्था, हातात फक्त एक गडी, अखेरच्या षटकातील आठ धावा आणि शेवटच्या चेंडूवर विजयासाठी तीन धावांची गरज! या प्रत्येक टप्प्यावर पाकिस्तानला विजेतेपदाची स्वप्ने पडत होती. पण मोहित उल्वाने त्या स्वप्नांचा चक्काचूर केला. क्रिकेटमध्ये केवळ मोठी धावसंख्या उभारणे म्हणजे सामन्यावर वर्चस्व नव्हे. ती धावसंख्या राखण्याची क्षमता, प्रतिकूल परिस्थितीत संयम आणि शेवटपर्यंत लढण्याची वृत्तीही तितकीच महत्त्वाची असते. पाकिस्तानने धावांचा डोंगर उभारला; पण भारतीयांनी जिद्दीचा हिमालय उभा केला.

पाकिस्तानला धावांचा अहंकार होता, भारताकडे जिंकण्याचा निर्धार!

आणि अखेर शेवटच्या चेंडूवर मोहितच्या बॅटमधून निघालेला तो चौकार केवळ सीमारेषेपलीकडे गेला नाही, तर भारतीय क्रिकेटप्रेमींच्या आनंदाला गगनाला भिडवून गेला. आशिया चषक पुन्हा भारताकडे आला आणि युवा भारतीय शिलेदारांनी इतिहासाच्या पानावर आपली नावे सुवर्णाक्षरांनी कोरली!

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

आदिवासी वनपट्टाधारकांना आता ७-ई आणि १२-ई उताऱ्यांच्या माध्यमातून मिळणार मालकी हक्काचे संरक्षण

राज्यातील ११ जिल्ह्यांतील ३५ विधानसभा मतदारसंघांत विशेष मोहीम, १५ डिसेंबरपर्यंत प्रमाणपत्रांचे वाटप, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

आदिवासी समाजातील ज्या शेतकऱ्यांकडे वनहक्क पट्टा आहे, मात्र जमिनीच्या मालकी हक्काची अधिकृत नोंद नव्हती, अशा वनपट्टाधारकांना आता गाव नमुना ७-ई आणि १२-ई उतारे देण्यात येत आहेत. सामान्य शेतकऱ्यांसाठी जसा सातबारा महत्त्वाचा आहे, त्याचप्रमाणे आदिवासी शेतकऱ्यांसाठी हे उतारे महत्त्वाचे ठरणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य सरकारने आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्काचे संरक्षण देण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यातील ११ जिल्ह्यांमधील ३५ विधानसभा मतदारसंघांत ही मोहीम राबविण्यात येणार असून, १५ डिसेंबरपर्यंत पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्याचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नियोजन भवन येथे प्रसार माध्यमांशी संवाद साधला.

या उताऱ्यांच्या माध्यमातून आदिवासी शेतकऱ्यांना फार्मर आयडी, ॲग्रीस्टॅक, पीक विमा, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसह केंद्र व राज्य सरकारच्या विविध कृषी योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. पंचायत स्तरापासून ते प्रशासनातील सर्व संबंधित यंत्रणांना या मोहिमेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. स्वातंत्र्यानंतर प्रथमच आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या हक्काच्या दृष्टीने अशा प्रकारे न्याय देण्याचे काम होत असल्याचा आनंद असल्याचे बावनकुळे म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महसूलमंत्री म्हणून आपल्यावर सोपविलेली जबाबदारी पार पाडताना राज्यातील आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचे मालक म्हणून हक्क मिळवून देता आले, ही आपल्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यासाठी आनंदाची बाब असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

पुराव्यांअभावी वंचित शेतकऱ्यांनाही फार्मर आयडी

ज्या शेतकऱ्यांकडे जमिनीबाबत कोणतेही अधिकृत दस्तऐवज नाहीत, मात्र ते प्रत्यक्ष जमीन कसत आहेत, अशा शेतकऱ्यांनाही दिलासा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. १ जानेवारी २०१५ पूर्वीपासून जमीन कसत असल्याचा पुरावा असलेल्या शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्यात येणार आहे. यामुळे फार्मर आयडीपासून वंचित असलेल्या सुमारे १५ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

दुष्काळ निवारणासाठी ११ विभागांची एकत्रित जबाबदारी



राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकारने विविध विभागांच्या कामकाजात आवश्यक बदल केले आहेत. दुष्काळ निवारणासाठी ११ महत्त्वाच्या विभागांची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विकासकामांच्या आराखड्यातही बदल करण्यात आले आहेत. अनावश्यक कामे थांबवून पाणी, चारा आणि जलसंधारणासारख्या अत्यावश्यक उपाययोजनांना प्राधान्य देण्यात येत आहे.

ग्रामपंचायतींना जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून प्रत्येकी १५ लाख रुपये उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. त्यातून गावनिहाय जलसंधारण आणि ग्रामविकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, जलसंधारण, महसूल अशा ११ विभागांनी वासाठी समन्वयाने काम करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. चारा संवर्धनापासून जलसंवर्धनापर्यंत राज्य सरकारने सुमारे ४५ ते ४६ महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून, त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीतून दुष्काळावर मात करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

कोळसा खाणीतील पाणी शेतीसाठी वापरण्याचे नियोजन वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्यूसीएल) आणि मँगनीज ओर इंडिया लिमिटेड (मॉइल) यांच्या खाणींमधून खनिज उत्खनन करताना मोठ्या प्रमाणात पाणी बाहेर येते. हे पाणी नदी-नाल्यांमध्ये सोडण्याऐवजी त्याचा उपयोग शेतकऱ्यांसाठी कसा करता येईल, यावर सरकार विचार करत आहे. खाणींमधून उपसल्या जाणाऱ्या पाण्याचा शेतीसाठी उपयोग करण्यासंदर्भात बैठक घेण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

अजिंतदादांचे व्हिजन पूर्ण करणे हीच खरी श्रद्धांजली

लोकनेते अजित पवार यांच्या पुतळ्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते अनावरण होत असल्याबद्दल आनंद व्यक्त करताना बावनकुळे म्हणाले की, अजितदादांवर अमित शाह यांचे मनापासून प्रेम होते. आमचीही त्यांच्यावर मोठी श्रद्धा होती. मात्र, ते आज आपल्यात नाहीत. त्यांनी राज्याच्या विकासासाठी जे व्हिजन मांडले होते, ते पूर्ण करण्याची जबाबदारी आता आपली आहे. अर्थमंत्री म्हणून त्यांनी राज्यासाठी मांडलेले विविध विषय पुढे नेणे आवश्यक आहे. त्यांच्या पुतळ्याच्या अनावरणातून आम्हाला प्रेरणा मिळेल.

विकासासाठी मतदारसंघ पुनर्रचना आवश्यक

मतदारसंघ पुनर्रचनेच्या (डिलिमिटेशन) मुद्द्यावर बोलताना बावनकुळे म्हणाले की, राज्यात अनेक विधानसभा मतदारसंघ भौगोलिकदृष्ट्या अतिशय मोठे आहेत. काही मतदारसंघांचे क्षेत्रफळ १५० ते ३०० किलोमीटरपर्यंत विस्तारलेले आहे. मतदारसंघाचा विस्तार कमी झाल्यास लोकप्रतिनिधींना जनतेपर्यंत पोहोचणे आणि विकासकामे प्रभावीपणे करणे सोपे होईल. त्यामुळे विकासाच्या दृष्टीने मतदारसंघ पुनर्रचना होणे आवश्यक आहे.

विजय वडेट्टीवार हे खासगीत मतदारसंघ पुनर्रचनेची आवश्यकता मान्य करतात, मात्र राहुल गांधी त्यांना यावरून फटकारतील, असा टोलाही त्यांनी लगावला. लोकसभा आणि विधानसभेत काम करणाऱ्या लोकप्रतिनिधींनाच मोठ्या मतदारसंघांमधील अडचणींची वास्तविक जाणीव असते. त्यामुळे या विषयावर राजकीय विरोध न करता विकासाच्या दृष्टिकोनातून विचार झाला पाहिजे, असे ते म्हणाले.

राहुल गांधींनी परदेशात भारताची बदनामी करू नये

राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्यांवर टीका करताना बावनकुळे म्हणाले की, परदेशात जाऊन अमेरिकेतील विद्यार्थ्यांसमोर भारताची बदनामी करणे किंवा भारताला कमजोर दाखविणे योग्य नाही. राहुल गांधी यांचा प्रत्येक परदेश दौरा भारताला कमजोर करण्याच्या उद्देशाने असतो, असे चित्र दिसते. मात्र, भारताची ताकद, क्षमता आणि विकसित भारताचे स्वप्न जगासमोर मांडण्यासाठी त्यांनी दौरे केले, तर त्यांचे स्वागतच आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शेतकरी मदतीचे हप्ते निकषांनुसार

शेतकऱ्यांना मिळणाऱ्या आर्थिक मदतीच्या हप्त्यांबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, एनडीआरएफचे निकष निश्चित आहेत. त्यानुसार मदतीचे हप्ते वेगवेगळ्या टप्प्यांत दिले जातात. सर्व मदत एकाच वेळी मिळत नाही. नमो शेतकरी महासन्मान निधीच्या मदतीबाबत काही विलंब झाला असेल, तर मार्चपर्यंत पात्र शेतकऱ्यांना संपूर्ण रक्कम देणे आवश्यक आहे. वितरणात काही त्रुटी किंवा कमी-जास्त झाले असल्यास त्या दुरुस्त केल्या जातील, असे त्यांनी सांगितले.

प्लास्टिक बाटल्याऐवजी काचेच्या बाटल्यांचा वापर

प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्याचे ठरविले आहे. सरकारी कार्यालये आणि मंत्रालयात प्लास्टिकच्या बाटल्याऐवजी काचेच्या बाटल्यांचा वापर करण्यावर भर दिला जाणार आहे.

थोडक्यात

कोदामेंढी येथे दोन दिवसीय रात्रकालीन हत्तीरोग सर्वेक्षणादरम्यान रक्ताचे नमुने गोळा करण्यास आजपासून सुरुवात



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू :मौदा

जिल्हा हिवताप अधिकारी नागपूर डॉ. अदिती त्याडी यांच्या आदेशानुसार कोदामेंढी येथे दोन दिवसीय रात्रकालीन हत्तीरोग सर्वेक्षणाकरिता आरोग्य विभागाचे आरोग्य कर्मचारी २० वर्षावरील नागरिकांचे रक्ताचे नमुने आज सोमवार (ता. १६ नोव्हेंबर) ला रात्री ९:३० वाजता पासून घेण्यास सुरुवात केलेली आहे. उद्या मंगळवार (ता. १७) नोव्हेंबरला हे अभियान सुरू राहणार आहे.

कोदामेंढी येथे एकूण ३ पथक असून प्रत्येक पथकाला ५० नागरिकांचे असे एकूण दर दिवशी १५० नागरिकांचे रक्ताचे नमुने गोळा करायचे आहेत. वार्ड क्रं.३ येथील पथकात भिवापूर येथील फायलेरिया क्लिनिकचे फायलेरिया क्षेत्र कार्यकर्ता सुरज कुंभरे, कोदामेंढी प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येत असलेल्या धानोली उपकेंद्रातील आरोग्य सेवक मधुकर राऊत यांच्या समावेश असून ते नागरिकांना झोपेतून उठवून रक्ताचे नमुने गोळा करीत आहेत. फायलेरियाचे जंत हे रात्रीला सक्रिय होत असल्याने हे रक्ताचे नमुने रात्री ९:३० वाजता पासूनच गोळा करावे लागतात असे ते नागरिकांना सांगत आहेत, त्यामुळे हे रक्ताचे नमुने दिवसा गोळा करत नाहीत. कोदामेंढी येथे दोन रुग्ण फायलेरियाने ग्रस्त असल्याचे राऊत यांनी सांगितले. फायलेरिया मुक्त गाव करण्यासाठी शासनाचा आरोग्य विभाग हे अभियान रात्रीला राबवीत असल्याचे, आरोग्य कर्मचाऱ्यांनी सांगितले. प्रत्येक गावातील सरपंच व पोलीस पाटलांनी रात्रीला रक्ताचे नमुने गोळा करणाऱ्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या पथकाला सहकार्य करण्यासाठी आरोग्य विभागाकडून तसे पत्रही देण्यात आले आहे.

कोदामेंढी येथे जननायक बिरसा मुंडा यांची जयंती साजरी



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

कोदामेंढी येथील वार्ड क्र. २ मधील झेंडा चौकात आदिवासी क्रांतिकारी जननायक धरती आबा बिरसा मुंडा यांची १५१वी जयंती त्यांच्या फोटोला माल्यार्पण, अभिवादन व उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या विचारांवर प्रकाश टाकून उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, बोरी (घिवारी) सरपंच विशाल सेलोकर, कोदामेंढी उपसरपंच गोपाल गिरमेकर, तुलसीदास वरखडे, इसीराम वरखडे, भुरस्या पंधरे सह आदिवासी समाजातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भिवापुरात बिरसा मुंडा जयंती साजरी

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

महान स्वातंत्र्यसंग्राम सेनानी आणि आदिवासी समाजाचे जननायक भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती येथे श्रद्धा आणि उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या कायार्चे स्मरण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून केळापूर मतदारसंघाचे आमदार डॉ. संदीप धुर्वे उपस्थित होते. नागपूरचे संस्थापक राजवंशीय वीरेंद्र शाह, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर गुरव आणि विक्रांत मोहरे यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नरहरी पेंदाम होते. उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. समाजाच्या हक्कांसाठी आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी दिलेल्या लढ्याचे स्मरण करीत त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी अध्यक्षीय भाषणातून नरहरी पेंदाम यांनी शहरात भगवान बिरसा मुंडा यांचे स्मारक उभारून त्यांचा पुणाकृती पुतळा बसविण्यात यावा, अशी मागणी मान्यवरांकडे केली. यावर आमदार डॉ. संदीप धुर्वे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी लवकरच महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी विकासमंत्र्यांची भेट घेऊन पुतळा उभारण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाला महिला आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

जात प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन, अर्जातील माहिती तपासलेली व अचूक असावी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून संबंधितांच्या जात प्रमाणपत्र पडताळणीची प्रक्रिया पूर्ण करून त्याबाबत प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात येते. तथापि,ऑक्टोबर २०२६ पासून जात प्रमाणपत्र पडताळणीची कार्यप्रणाली नव्याने विकसित करण्यात आली असल्याचे समितीकडून कळवण्यात आले आहे. त्यानुसार अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज केल्यानंतर प्रत्यक्ष प्रस्तावित राहून अर्ज सादर करण्याची तसेच त्रुटी पूर्ततेसाठी कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची आवश्यकता उरलेली नाही. मात्र, ऑनलाईन अर्ज तपासणीदरम्यान अर्जदारांकडून काही सामान्य चुका होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अर्जदारांनी अर्ज भरताना योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त तथा सदस्य डॉ. मंगेश वानखडे यांनी केले आहे.जात प्रमाणपत्र पडताळणीकरिता ऑनलाईन अर्ज भरताना अर्जदाराने आपली प्राथमिक माहिती उपलब्ध जात प्रमाणपत्रानुसार अचूक भरावी. अर्जदाराने स्वतःचे, वडिलांचे आणि आडनावाचे स्पेलिंग जात प्रमाणपत्रात अचूक लिहावे. वडिलांच्या नावासमोर 'राव', 'जी' इ. शब्द जात प्रमाणपत्रात नमूद असतील तरच ते लिहावेत, अन्यथा लिहू नयेत. जात प्रमाणपत्रावरील रेव्हेन्यू केस नं. व एमआरसी नं. यांची माहिती अचूक नोंदवावी. जात प्रमाणपत्र निर्गमित केल्याचा दिनांक तसेच प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम, शहर आणि तहसीलची माहिती भरणे आवश्यक आहे.

पिंपळा येथे ५४ पशुपालकांना शंभर टक्के अनुदानावर वैरण बियाण्यांचे वाटप

जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत लाभार्थ्यांना दिलासा; सरपंच दिलीप चांदुरकर यांच्या हस्ते वितरण



दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

नरखेड तालुक्यातील पिपळा(केवलराम)येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ यांच्या वतीने जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत १३ नोव्हेंबर २०२६ रोजी पशुपालकांना शंभर टक्के अनुदानावर वैरण बियाण्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात गावचे सरपंच श्री. दिलीप चांदुरकर यांच्या हस्ते लाभार्थी पशुपालकांना वैरण बियाण्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी कृषी सहाय्यक अधिकारी श्री. योगेश मदनकर तसेच पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. एस. एच. आगवान उपस्थित होते.

या योजनेंतर्गत एकूण २१० लाभार्थ्यांपैकी पहिल्या टप्प्यात ५४ लाभार्थ्यांना शंभर टक्के अनुदानावर वैरण बियाण्यांचा लाभ देण्यात आला. पशुपालकांना पौष्टिक हिरवा चारा उपलब्ध व्हावा, जनावरांचे आरोग्य सुधारावे तसेच दुग्धोत्पादनात वाढ व्हावी, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र पशुपालकांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने पशुवैद्यकीय दवाखान्याचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत असून, यामुळे पशुपालकांना आर्थिक दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.

सेकंड बिगनिंगच्या दिवाळी स्नेहमिलनात गीत-संगीताची रंगत; महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

दिवाळी हा केवळ दिव्यांचा नव्हे, तर मने जोडणारा सण : विधी झा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सेकंड बिगनिंगच्या वतीने फाउंडर विधी झा यांच्या नेतृत्वाखाली सिताबर्डी येथील रिगल बँक्वेट हॉलमध्ये दिवाळी स्नेहमिलनाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. संयोजिका एकता भैया आणि श्वेता गिरी यांच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमात ५० वर्षांवरील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

कार्यक्रमात गीत-संगीत, अंताक्षरी, मनोरंजक खेळ आणि लक्ष्मी-गणेश संकल्पनेवर आधारित दिवाळी हौजीचे आयोजन करण्यात आले. प्रोजेक्ट डायरेक्टर भावना जैन यांनी हौजीचे नियोजन केले. यावेळी स्वाती गिरी यांनी आरोग्यदायी दिवाळी साजरी करण्याबाबत मार्गदर्शन केले, तर एलएडी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. हर्षा झारिया यांनी दीपावलीचे सांस्कृतिक महत्त्व विशद केले.



यावेळी विधी झा यांनी महिलांनी कौटुंबिक जबाबदाऱ्यांसोबत स्वतःसाठीही वेळ काढून सामाजिक उपक्रमांत सहभागी व्हावे, असे आवाहन केले. अशा स्नेहमिलनातून मैत्री, आपुलकी आणि एकजूट वाढते. दिवाळी हा केवळ दिव्यांचा नव्हे, तर मने जोडणारा सण असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वंदना व्यास, डॉ. प्रीती सावरकर, रेखा आष्टी, पूजा झाम, भावना जैन, मीना गुप्ता, नीता नायक, मधु व्यास, शोभा भागिया, निकिता बागडी, शालू मिश्रा, मोना त्रिपाठी, अँड. सुरेखा बोरकुटे, अलका टोटे, नीता पुण्यानी यांच्यासह सदस्यांनी सहकार्य केले.

२ किलो अफू, दोन वाहने आणि पाच मोबाईलसह ३०.६५ लाखांचा मुद्देमाल जप्त; पिकअपमधून पायलटगिरी, इकोस्पोर्टमधून तस्करी

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

अमली पदार्थांच्या तस्करीसाठी तस्करांनी चक्क पायलट वाहनाचा वापर केल्याचा धक्कादायक प्रकार पोलिसांच्या कारवाईत उघडकीस आला आहे. अफूची वाहतूक करणाऱ्या इकोस्पोर्ट वाहनाच्या पुढे बोलेरो पिकअप धावत होती. रस्ता मोकळा असल्याची खात्री करून देण्याची जबाबदारी पिकअप चालक पार पाडत होता. मात्र, पोलिसांच्या सतर्कतेमुळे तस्करांची ही शक्कल अखेर फसली. पोलिसांनी तालुक्यातील नांद गावात दोन्ही वाहनांना पकडून दोन सख्ख्या भावांना अटक केली.

त्यांच्याकडून २.००३ किलो



अफूसह दोन वाहने, रोख रक्कम आणि मोबाईल असा एकूण ३० लाख ६५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

नागपूर ग्रामीण पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथकाला रविवारी (१५ नोव्हेंबर) बुटीबोरी परिसरात गस्तीवर असताना मध्यप्रदेश आणि राजस्थान पासिंगच्या दोन वाहनांतून अफूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन सायबर पोलीस स्टेशनच्या तांत्रिक सहकार्याने संशयित वाहनांचा शोध घेण्यात आला. यावेळी बेला-सिर्सी मार्गावर बोलेरो पिकअप आणि इकोस्पोर्ट ही दोन्ही वाहने आढळली.

पोलिसांनी वाहनांना थांबविण्याचा प्रयत्न केला असता चालकांनी वेगाने भिवापूरच्या दिशेने पळ काढला. पोलीस पथकाने भिवापूर पोलिसांच्या मदतीने वाहनांचा पाठलाग सुरू केला. अखेर नांद गावात दोन्ही वाहनांना अडविण्यात पोलिसांना यश आले. वाहनांची झडती घेतली असता इकोस्पोर्टच्या डिक्कीत अफूचे दोन बंडल आढळून आले. त्याचे वजन २.००३ किलो असून किंमत १० लाख १ हजार ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणात पवन सत्यनारायण ऊर्फ कालिदास पाटीदार (वय ३०) हा इकोस्पोर्टमधून अफूची वाहतूक करीत होता, तर लोकेशकुमार सत्यनारायण ऊर्फ कालिदास पाटीदार (वय ३२) हा बोलेरो पिकअपमधून पुढे राहून पायलट वाहनाची भूमिका बजावत होता. दोघेही मध्यप्रदेशातील नीमच जिल्ह्यातील जावद तहसीलमधील बसेडीभाटी येथील रहिवासी असून सख्खे भाऊ आहेत.

पोलिसांनी अफूसह राजस्थान पासिंगची इकोस्पोर्ट (आरजे ०९ सीसी ०३३९), मध्यप्रदेश पासिंगची महिंद्रा बोलेरो पिकअप (एमपी १३ एएल ८७९५), २,५०० रुपये रोख आणि पाच मोबाईल असा एकूण ३० लाख ६५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी भिवापूर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), १७(ख), २२ आणि २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. ठाणेदार अजितसिंग देवरे पुढील तपास करीत आहेत.

थोडक्यात

सेवानिवृत्त पोलिस अधिकाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न

शंकरा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलच्या सहकार्याने आयोजन, १०० सदस्यांचा सहभाग



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र सेवानिवृत्त पोलिस अधिकारी कल्याणकारी असोसिएशन, नागपूरची सर्वसाधारण सभा रविवार, १५ नोव्हेंबर रोजी, धंतोली येथील शंकरा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अध्यक्ष रमेश मेहता यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. या सभेला असोसिएशनचे सुमारे १०० सदस्य उपस्थित होते. सभेनंतर हॉस्पिटलच्या सौजन्याने सदस्यांसाठी मोफत सर्वसाधारण आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. यामध्ये ईसीजी, रक्तदाब (बीपी), रक्तशर्करा आदी तपासण्या करून तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला. यावेळी अस्थिरोग व सांधेरोग तज्ज्ञ डॉ. जितेंद्र रामलखन यादव, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अग्रवाल आणि जनरल सर्जन डॉ. इंगळे यांनी सेवानिवृत्त पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना वाढत्या वयात आरोग्याची काळजी, योग्य आहार, आजारांवरील उपचार आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला अध्यक्ष रमेश मेहता, गुप्ता, रामलखन यादव, सुरेश महाले, नागेश घोडकी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वितेसाठी डॉ. जितेंद्र रामलखन यादव व त्यांच्या वैद्यकीय चमूने विशेष सहकार्य केले.

तसेच असोसिएशनचे अध्यक्ष रमेश मेहता, कोषाध्यक्ष गुप्ता, सचिव सुरेश महाले, सहसचिव नागेश घोडकी, कार्यकारी सदस्य देवलकर, मोरेश्वर उपासे, आबाराव मेंढे, केवाराम हटवार आणि हॉस्पिटलचे लायझनिंग अधिकारी राजेश यादव यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. शंकरा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली माफक दरात विविध आरोग्य तपासण्या व उपचारविषयक सल्ला उपलब्ध असल्याची माहिती देत, सर्वांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष रमेश मेहता यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन सचिव सुरेश महाले यांनी तर सहसचिव नागेश घोडकी यांनी आभार मानले. शेवटी हॉस्पिटल व रामलखन यादव यांच्या सौजन्याने आयोजित स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

पहाटेच्या टाळ-मृदंगाचा गजर अन् भक्तिरसात न्हाऊन निघतेय आग्रा नगरी!

शंभर वर्षांची धार्मिक परंपरा आजही अखंड सुरू; कार्तिक महिन्यात महिनाभर काकड आरतीचा भक्तिमय सोहळा



दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

नरखेड तालुक्यातील आग्रा येथे शंभर वर्षांहून अधिक काळापासून सुरू असलेली काकड आरतीची धार्मिक परंपरा आजही मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात जोपासली जात आहे. कार्तिक महिन्याच्या पवित्र पर्वात कोजागिरीपासून सुरू होणारा हा धार्मिक उपक्रम महिनाभर चालतो. दररोज पहाटे पाच वाजताच गावात काकड आरतीला सुरुवात होते. टाळ-मृदंगाचा गजर, भजन आणि भक्तिगीतांच्या सुरेल वातावरणात भाविक संपूर्ण गावातून प्रदक्षिणा घालतात. गावातील लहान-मोठ्या मंडळींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे या उपक्रमाला विशेष उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पहाटेच्या शांत वातावरणात घुमणारा आरतीचा स्वर आणि विठ्ठल नामाचा गजर यामुळे संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघते.

ही शंभर वर्षांची धार्मिक परंपरा अखंड सुरू राहावी आणि नव्या पिढीलाही तिचे महत्त्व समजावे, या उद्देशाने जगदीश जीवतोडे, नंदलाल मोवाडे, कमलाकर गेडाम यांच्यासह गावातील सर्व भाविक मंडळी विशेष पुढाकार घेत आहेत. आजच्या आधुनिक युगातही गावातील धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा जपण्याचे आग्रा ग्रामस्थांचे हे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे. काकड आरतीच्या माध्यमातून गावात भक्तिभाव, एकोपा आणि सामाजिक सलोख्याची भावना अधिक दृढ होत असून, शंभर वर्षांची ही परंपरा पुढील पिढ्यांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

कर्मचारी भरतीबाबत सोशल मीडियावर बनावट जाहिरातींचे पेव, महावितरणशी संबंध नाही

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महावितरणमध्ये तब्बल २३ हजारांवर विविध पदांसाठी कोणतीही परीक्षा किंवा मुलाखत न घेता थेट भरती सुरू असल्याच्या खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिराती किंवा माहिती सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. केवळ दहावी उत्तीर्ण उमेदवारांसाठी ही भरती असल्याचे सांगत हजारो रुपयांच्या वेतनाचे आमिष दाखवले जात आहे. मात्र या सर्व जाहिराती किंवा माहिती दिशाभूल करणारी असून त्याचा महावितरणशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेल्या नाहीत, अशा कोणत्याही बनावट जाहिरातींबाबत उमेदवारांनी सावध राहावे. सर्व पदांच्या भरती प्रक्रियेबाबतची कोणतीही अधिकृत जाहिरात किंवा वेळोवेळी दिली जाणारी माहिती ही केवळ महावितरणच्याच www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाते. उमेदवारांनी महावितरणमधील कर्मचारी भरतीबाबत कोणतीही माहिती किंवा जाहिरातीबाबत अधिकृत संकेतस्थळावर खात्री करून घ्यावी असेही स्पष्ट करण्यात आले आहे. यासोबतच भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याची लिंक देखील महावितरणच्याच अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे उमेदवारांनी फसवणूक टाळण्यासाठी सोशल मीडियावरून प्राप्त झालेल्या संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये आणि अशा प्रकारच्या दिशाभूल करणाऱ्या व चुकीच्या माहितीवर उमेदवारांनी किंवा नागरिकांनी अजिबात विश्वास ठेवू नये असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

एनएमआरडीए क्षेत्रात नागरी सुविधांची स्थिती पाहूनच नवीन ले-आऊटला परवानगी

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश, नागपूर शहरातील विविध बाबी व विकास कामांचा आढावा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण अंतर्गत येत असलेल्या शहरातील अनेक भागात नव्याने ले-आऊट होत आहेत. परंतू त्या ठिकाणी आवश्यक सुविधा विकासकांकडून केल्या जात नसल्याने दिसून येते. तशा अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे यापुढे नवीन ले-आऊटला मान्यता देतांना नागरी सुविधांची स्थिती पाहूनच मान्यता द्या, त्याशिवाय देऊ नका, असे निर्देश महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.



नियोजन भवन येथे श्री.बावनकुळे यांनी नागपूर महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणासह विविध विकास कामांचा आढावा घेतला. बैठकीला राज्यमंत्री अॅड आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आ.डॉ.राजीव पोतदार, आ.चरणसिंह ठाकुर, आ.संजय मेश्राम, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, एनएमआरडीएचे अध्यक्ष संजय मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आदी उपस्थित होते.

अनेक ले-आऊटमध्ये पाणी, रस्ता, वीज यासारख्या प्राथमिक सुविधा नाही. यासह शासनाने निधारींत केलेल्या सर्व सुविधा असणे आवश्यक आहे. सद्या परवानगी दिलेल्या ले-आऊटमधील नागरी सुविधांची पाहणी करा. आवश्यक असल्यास ड्रोन सर्वे करा. यापुढे नवीन परवानगी देतांना सुविधांची काटेकोर तपासणी केली जावी. नियमाप्रमाणे सुविधा नसल्यास परवानगी नाकारा, अशा स्पष्ट सूचना महसूलमंत्र्यांनी एनएमआरडीए दिल्या.

नवीन नागपूरच्या भूसंपादनाला गती

नवीन नागपूर प्रकल्पासाठी जमिनी घेतांना कमी मोबदला दिला जात असल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. अशा १४ शेतकऱ्यांच्या मोबदल्याचे प्रकरण पुन्हा तपासा, या शेतकरी पुर्वी ओलिताची पिके घेत असल्याचे दिसून आल्यास त्यानुसार त्यांचे मोबदल्याचे प्रकरण करा. नवीन नागपूर प्रकल्पाचे उर्वरीत भूसंपादन गतीने करा, तसेच शहरातील प्रस्तावित तिसऱ्या रिंगरोडसाठी संयुक्त मोजणीचे काम शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन करण्याचे निर्देश दिले.

विहीरगावातील सुटलेल्या भागाला पाणी पुरवठा

विहीरगाव मधील तुकाराम नगर, तिडके नगर, महालक्ष्मी नगर हा पाणी पुरवठा योजनेतून सुटलेला भाग अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेला जोडावा. जोडणे शक्य नसल्यास या भागासाठी स्वतंत्र योजना प्रस्तावित करावी आणि त्याद्वारे पाणी पुरवठ्याचा प्रश्न सोडवावा.

अनधिकृत बांधकामे थांबविण्यासाठी समिती

शहरी भागात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम होत असल्याचा मुद्दा राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी उपस्थित केला. ही अतिशय गंभीर बाब असून भविष्यात असे बांधकाम होऊ नये आणि झालेल्या बांधकामांची माहिती संकलित करण्यासाठी नगर रचनाकाराच्या प्रमुखतेत समिती करण्याचे निर्देश महसूलमंत्र्यांनी दिले. ही समिती झालेली अनधिकृत बांधकामे आणि भविष्यात अशी बांधकामे होऊ नये, याबाबत अहवाल देतील. अनधिकृत बांधकामांसाठी मुख्याधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश देखील दिले.

पांदनरस्ते व नाला खोलिकरणासाठी मंडळनिहाय नियोजन

जिल्ह्यातील अनेक तलाव, नाल्यांमध्ये पांदनरस्त्यांसाठी उपयुक्त ठरू शकणारा मुरुम उपलब्ध आहे. त्यामुळे महसूल मंडळनिहाय घेण्यात येणारी पांदनरस्त्यांची कामे आणि मुरुम उपलब्ध असलेल्या तलाव, बंधाऱ्यांची खोलिकरणासाठी सविस्तर माहिती घेऊन नियोजन करण्यात यावे. यामुळे पांदनरस्ते तर होतीलच तलाव, बंधारे देखील उपसल्या जातील.

एनएमआरडीए व वनक्षेत्रात जलसंवर्धनाचे प्रस्ताव

यावर्षी दुष्काळी स्थिती असल्याने एनएमआरडीए व जिल्ह्यातील वन क्षेत्रातील तलाव, बंधारे यांचे खोलीकरण, संवर्धन होणे आवश्यक आहे. त्यामुळे दोनही संस्थांनी आपल्या क्षेत्रातील सर्व प्रकारचे तलाव, बंधाऱ्यांची माहिती घेऊन प्रस्ताव सादर करावा. वनभागात जेथे चाराक्षेत्र वाढवणे शक्य आहे, तेथे तसे प्रस्ताव तयार करावे, असे निर्देश दिले.

जलजीवन मिशनच्या २८० प्रकल्पांना तत्काळ निधी

यावेळी महसूलमंत्र्यांनी पाणी टंचाई स्थितीचा आढावा घेतला. जिल्ह्यात जलजीवन मिशनच्या २८० प्रकल्पांना प्रत्येकी ४ ते ५ लाखाचा निधी उपलब्ध करून दिल्यास या योजना सुरु होऊ शकतात, असे जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले.

थकबाकीमुक्तीसह स्मार्ट पाऊल; सिव्हिल लाईन्स उपविभागात 'अभय योजने'तून पहिली प्रीपेड वीज जोडणी!

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

वीज बिल भरणा न झाल्यामुळे थकित रकमेचा डोंगर साचलेल्या आणि परिणामी वीजपुरवठा खंडित (पीडी) झालेल्या ग्राहकांसाठी महावितरणतर्फे सुरू करण्यात आलेली 'अभय योजना २०२६-२७' नागपुरात अत्यंत प्रभावी ठरत आहे. या योजनेमुळे सामान्य ग्राहकांना मोठा आर्थिक दिलासा मिळत असून, या उपक्रमाला नागपूर शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. यादरम्यान, सोमवारी (दि. १६ नोव्हेंबर) सिव्हिल लाईन्स उपविभागांतर्गत बंडू वासुदेव कुमरे या ग्राहकाने आपली जुनी सर्व थकबाकी एकरकमी भरत अभय योजनेचा लाभ घेतला. विशेष म्हणजे, थकबाकी भरून मुख्य प्रवाहात परतताना त्यांनी भविष्यातील वीज वापरासाठी पारंपारिक मीटरऐवजी आधुनिक प्रीपेड मीटर प्रणालीचा स्वीकार केला आहे.

बंडू कुमरे यांच्याकडे महावितरणची एकूण ७१९० रुपयांची थकबाकी होती. बऱ्याच महिन्यांपासून आर्थिक किंवा अन्य अडचणींमुळे वीजबिलाचा भरणा रखडल्यामुळे महावितरणला नियमानुसार सक्तीची कारवाई करत त्यांचा वीज पुरवठा खंडित करावा लागला होता. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतरही नियमांनुसार थकित रकमेवर सतत व्याज आणि विलंब आकार वाढू लागल्याने ग्राहकांवरील आर्थिक ताण अधिकच वाढतो.



अशा प्रकारे वीजपुरवठा खंडित झालेल्या आणि आर्थिक अडचणीत सापडलेल्या ग्राहकांच्या थकित रकमेवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार पूर्णपणे माफ करून, त्यांना सन्मानाने पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशानेच महावितरणने अभय योजना २०२६-२७ ची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली आहे. या योजनेचे स्वरूप आणि त्यातून होणारा आर्थिक फायदा लक्षात घेता, बंडू कुमरे यांनी तात्काळ या योजनेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यांनी आपल्या मूळ थकबाकीच्या ५७६० रुपयांचा एकरकमी भरणा करून थकबाकीच्या जाळ्यातून कायमची मुक्तता मिळवली. या योजनेत सहभागी झाल्यामुळे महावितरणने त्यांच्याकडील तब्बल १४३० रुपयांचा व्याज आणि विलंब आकार पूर्णपणे माफ केला आहे.

सिव्हिल लाईन्स उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता नितीन उज्जैनकर आणि त्यांच्या संपूर्ण टीमने दाखवलेली तत्परता या यशामध्ये महत्त्वाची ठरली. उज्जैनकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी बंडू कुमरे यांच्याशी व्यक्तिगत संवाद साधत त्यांना अभय योजनेच्या फायद्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रशासनाकडून मिळालेल्या या सकारात्मक सहकार्यामुळे व मार्गदर्शनामुळे कुमरे यांनी केवळ जुनी थकबाकी भरली नाही, तर महावितरणच्या डिजिटल व आधुनिक प्रवाहात सामील होत थेट प्रीपेड मीटरचा पर्याय निवडला.

पारंपारिक वीज मीटरच्या तुलनेत प्रीपेड मीटर प्रणाली ग्राहकांसाठी अत्यंत फायदेशीर आणि पारदर्शक ठरत आहे. प्रीपेड मीटरमुळे ग्राहकांना त्यांच्या वीज वापराचे चोवीस तास अचूक नियोजन करता येते. रिचार्ज संपण्याच्या काही दिवस आधी ग्राहकांना मोबाईलवर अलर्ट्स मिळतात, ज्यामुळे वेळेवर रिचार्ज करणे सुलभ होते. या प्रणालीमुळे वीजबिलांमध्ये येणाऱ्या त्रुटींना पूर्णविराम मिळून संपूर्ण कारभार अत्यंत पारदर्शक होतो. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, आगाऊ रिचार्ज करण्याच्या या पद्धतीमुळे भविष्यात कधीही वीजबिलांची थकबाकी निर्माण होण्याची शक्यता उरतच नाही. त्यामुळे ग्राहकांना कायमस्वरूपी आर्थिक शिस्त आणि मानसिक शांतता लाभते. सिव्हिल लाईन्स उपविभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि ग्राहकहिताच्या दृष्टिकोनामुळे ही एक उत्तम यशोगाथा नागपुरात साकारली आहे.

या यशस्वी उदाहरणाचा दाखला देत, महावितरणच्या नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी नागपूर परिसरातील सर्व पात्र व थकबाकीदार ग्राहकांसाठी एक महत्त्वाचे आवाहन केले आहे. त्यांनी स्पष्ट केले आहे की, सर्व पात्र ग्राहकांनी महावितरणच्या अभय योजना २०२६-२७ या सुवर्णसंधीचा तात्काळ लाभ घ्यावा, या योजनेत सहभागी होत थकबाकीमुक्त जीवन जगावे आणि आगामी काळात वीज बिलांचा सुलभ व्यवहारांसाठी व पारदर्शक कारभारासाठी आधुनिक प्रीपेड मीटरचा पर्याय आवर्जून स्वीकारावा.

'टायगर रिकव्हरी फोर्स'च्यावतीने दिवाळी सहकार मेळावा आणि सहकार सप्ताह

टायगर रिकव्हरी फोर्सचा 'दिवाळी सहकार मेळावा' सहकार सप्ताह संपन्न उत्कृष्ट रिकव्हरी मेंबर्सचा गौरव!



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दिवाळीच्या सुवर्णमुहूर्तावर १४ नोव्हेंबर रोजी 'टायगर रिकव्हरी फोर्स'च्या वतीने दिवाळी सहकार मेळावा आणि सहकार सप्ताह मोठ्या उत्साहात पार पडला. या विशेष कार्यक्रमात वर्षभरात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या रिकव्हरी मेंबर्सना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र आणि टी शर्ट, बॅग, देऊन गौरविण्यात आले. प्रथम पुरस्कार दर्शना कडू, महेंद्र बागडे द्वितीय पुरस्कार सतीश नलवडे, मंदार वाघाले तृतीय पुरस्कार विशाल जीवतोडे, अस्विनी तितरे तसेच सर्वाना पुरस्कार देवुन गौरवण्यात आले. पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात, कल्याणी मेघरे, स्मिता डंभारे, चंदा भानुसे, चेतना सोनकुसरे, वर्षा सोनकुसरे, रामा भानारकर, मोहित चिंचखेडे, फारुख शेख, पूनम बनसोड, शीतल भगत, प्रियंका डोंगरे, राहुल चिंचखेडे, संगीता बुरडे, मंजुषा खोले, आणि अन्य विशेष सत्कार करण्यात आला.

या सत्कार सोहळ्याचे दीपप्रज्वलन व सत्कारकार्य राजेंद्र घाटे, (अध्यक्ष नागपूर जिल्ह्य पतसंस्था व कर्म, पत संघ मर्या नागपूर) मिलिंद जीवने,(शक्य) अध्यक्ष सिव्हिल राईट प्रोटेक्शन सेल पुरुष पंडागळे, श्री सागर मेश्राम सचिव -युनायटेड को ऑपरेटिव्ह फेडरेशन प्रमोद चिंचखेडे, डायरेक्टर टायगर रिकव्हरी फोर्स. महेंद्र मानके आणि सुनील चिरकुटे, महादेव शिरसाट, तायडे, नितीन पाटील, अध्यक्ष युथ वेलफेअर असोसिएशन धरम पाटील, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहित चिंचखेडे, बॉबी चिंचखेडे, सोनाली व खुशबू यांनी सहकार्य केले.

जल, जंगल, जमिनीच्या रक्षणाचा बिरसा मुंडेंचा विचार आजही प्रेरणादायी!

जलालखेड्यात भगवान बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी; जय जोहार समितीचा पुढाकार, भजन-गीतांच्या सुरेल कार्यक्रमाने रंगत

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

आदिवासी समाजाच्या अस्मितेचा हुंकार, अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचे प्रतीक आणि जल, जंगल व जमिनीच्या संरक्षणासाठी लढा देणारे महान क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांची जयंती जलालखेडा येथे मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात साजरी करण्यात आली. रविवार, १५ नोव्हेंबर २०२६ रोजी जय जोहार समिती, जलालखेडा यांच्या वतीने वार्ड क्रमांक १ येथे सायंकाळी ६ वाजता या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. यावेळी आदिवासी समाजबांधवांसह गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.



भगवान बिरसा मुंडा हे केवळ आदिवासी समाजाचे आराध्य दैवत नसून ते अन्याय, शोषण आणि गुलामगिरीविरुद्ध उभ्या राहिलेल्या संघर्षाचे जिवंत प्रतीक आहेत. ब्रिटिश राजवटीविरुद्ध त्यांनी उभारलेला लढा, आदिवासींच्या पारंपरिक हक्कांसाठी केलेला संघर्ष आणि समाजामध्ये निर्माण केलेली जागृती आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या ऐतिहासिक कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांची आजच्या पिढीला असलेली गरज अधोरेखित केली.

आदिवासी अस्मिता, एकता आणि शिक्षणाचा संदेश

कार्यक्रमादरम्यान भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला. आदिवासी समाजाने आपल्या हक्कांबाबत जागरूक राहावे, मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य द्यावे, सामाजिक एकता टिकवून ठेवावी तसेच आपल्या रूढी, परंपरा आणि संस्कृतीचे जतन करावे, असे आवाहन करण्यात आले. जल, जंगल आणि जमीन यांच्याशी आदिवासी समाजाचे असलेले नाते जपणे ही काळाची गरज असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

भगवान बिरसा मुंडा यांनी दिलेला स्वाभिमान, संघर्ष आणि संघटित शक्तीचा संदेश केवळ एका समाजापुरता मर्यादित नसून संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाला नरेश अरसडे, प्रतीक्षा दंडारे, महादेवराव वटके यांच्यासह अनेक मान्यवर, आदिवासी समाजातील महिला-पुरुष आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

मोहगावच्या बजरंग भजन मंडळाने जिंकली उपस्थितांची मने

जयंती सोहळ्यातील विशेष आकर्षण ठरले ते मोहगाव येथील बजरंग भजन मंडळाचे सादरीकरण. मंडळाचे अध्यक्ष सुरेशजी टेकाम यांच्या नेतृत्वाखाली कलाकारांनी पारंपरिक भजने आणि सुमधुर गीतांची सुरेल मेजवानी सादर केली. भजन आणि गीतांच्या तालावर संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कलाकारांच्या उत्कृष्ट सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

जय जोहार समितीचा स्तुत्य उपक्रम

या कार्यक्रमाचे आयोजन जय जोहार समितीचे अध्यक्ष सुदासजी कवडती, उपाध्यक्ष दिलीपरावजी युनाती आणि सचिव अंकुश कुमरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रोशन वरखडे, रोहित परतेती, निखिल परतेती, अक्षय जांबू, रजत वलके, शुभम ईरपाची आणि कृष्णा मडावी यांनी विशेष परिश्रम घेतले.

समाजातील बांधवांना एकत्र आणून महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्याचा समितीचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवर, समाजबांधव आणि ग्रामस्थांचे आभार मानण्यात आले. उत्स्फूर्त सहभाग, सामाजिक एकतेचा संदेश आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सुरेल वातावरणात भगवान बिरसा मुंडा जयंती सोहळा उत्साहात संपन्न झाला.

थोडक्यात

फासेपारधी समाजाच्या मागण्यांना शासनाची सकारात्मक दिशा

आश्रमशाळेसाठी ६ कोटींची भरपाई, सात महिला बचत गटांना १.४० कोटी; भूमिहीनांना पट्टे व बेघरांसाठी ९० घरकुलांचा प्रस्ताव



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

स्वातंत्र्यानंतर प्रथमच फासेपारधी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांची शासनस्तरावर गांभीर्याने दखल घेण्यात आल्याचा दावा फासेपारधी समाज संघटनेने केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तसेच महसूल मंत्री व अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून मंत्रालयात आयोजित बैठकीत समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि मूलभूत सुविधांशी संबंधित मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली. श्री दादाजी फासेपारधी समाज संघटना आणि पारधी विकास परिषदेच्या पुढाकाराने झालेल्या या बैठकीत मतीन भोसले, प्रवीण पवार, प्रशांत पवार यांच्यासह समाजाच्या प्रतिनिधींनी विविध प्रश्न मांडले.

अमरावती जिल्ह्यातील मंगरूळ चव्हाळा येथील प्रश्नचिन्ह आदिवासी आश्रमशाळेची इमारत समृद्धी महामार्गाच्या कामात पाडण्यात आल्याने नवीन इमारतीसाठी ६ कोटी रुपयांची नुकसानभरपाई आणि प्रलंबित १७ लाख रुपयांचा निधी तातडीने वर्ग करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे संघटनेने सांगितले. तसेच विद्यार्थ्यांच्या उपक्रमांसाठी १० एकर शासकीय जमीन उपलब्ध करून देणे आणि आश्रमशाळेत अकरावी- बारावीचे वर्ग सुरू करण्याबाबतही सकारात्मक भूमिका घेण्यात आली. याशिवाय १४ एप्रिल १९९० पूर्वीपासून सरकारी ई- क्लास जमिनीवर कसणूक करणाऱ्या भूमिहीन फासेपारधी बांधवांना नियमानुसार मालकी हक्काचे पट्टे देण्याची प्रक्रिया गतिमान करण्याचे निर्देश देण्यात आले. पारधी पँकेजमधील ७ कोटी रुपयांचा निधीतून सात महिला बचत गटांना प्रत्येकी २० लाख रुपये, असे एकूण १ कोटी ४० लाख रुपये वितरित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. उर्वरित निधी अपंग, अंध आणि विधवा महिलांच्या कल्याणासाठी वापरण्याबाबतही चर्चा झाली. समाजातील बेघर कुटुंबांसाठी ९० घरकुले उपलब्ध करून देणे तसेच सुशिक्षित बेरोजगार तरुणांना आर्थिक मदत, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी स्वतंत्र फासेपारधी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्या बाबतही सकारात्मक भूमिका मांडण्यात आली. या निर्णयांमुळे फासेपारधी समाजाच्या शिक्षण, निवारा, जमीन, महिला सक्षमीकरण आणि रोजगाराच्या प्रश्नांना नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या बैठकीतील निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास समाजाच्या विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास संघटनेच्या प्रतिनिधींनी व्यक्त केला. समाजाच्या मागण्यांची दखल घेतल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे संघटनेच्या वतीने आभार मानण्यात आले. तसेच मतीन भोसले, प्रवीण पवार, प्रशांत पवार आणि सहकाऱ्यांच्या प्रयत्नांचे अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी पत्रकार परिषदेच्या मंचावरील नुरदास पवार, योगेश पवार, मतीन भोसले आणि रुपेश पवार यांची उपस्थिती होती.

येसंबा येथे जननायक भगवान बिरसा मुंडा यांची जयंती साजरी



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

चाचेर-निमखेडा जि प सर्कल अंतर्गत येणाऱ्या येसंबा येथे आदिवासी क्रांतिकारी जननायक भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती त्यांच्या फोटोला माल्यार्पण, अभिवादन व त्यांच्या जीवनपटावर मान्यवरांनी प्रकाश टाकून उत्साहात साजरी केली. याप्रसंगी खंडाळा (गांगणेर) सरपंच, गांगणेर आरोग्य उपकेंद्र आरोग्य सभापती, भाजपा किसान आघाडी जिल्हा महामंत्री सकेत झाडे, माजी पं स मौदा उपसभापती खेमराज चापले, येसंबा उपसरपंच धनराज हारोडे, पोलीस पाटील नरेंद्र राऊत,मंगेश चापले, हिरा चकोले सह ग्रामस्थ उपस्थित होते.

जीवाबेन पटेल यांचे निधन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सेंट्रल अव्हेन्यूवरील आंबेडकर चौक परिसरातील रहिवासी जीवाबेन भाणजी भाई पटेल यांचे निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. त्यांच्यावर गंगाबाई घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. कुटुंबीयांनी मरणोपरांत त्यांचे नेत्रदान केले. त्यांच्या पश्चात मुलगा दिनेश, नातू घनश्याम, तरुण, शैलेश यांच्यासह बराच मोठा आप्त परिवार आहे.

कीर्तनकार दौलत महाराज सातपुतेंचा संशयास्पद मृत्यू



वृत्तसंस्था, जालना - जालना जिल्ह्यातील सावंगी अवघडराव येथील पुरातन पाताळेश्वर मंदिराचे मठाधिपती आणि कीर्तनकार देवेंद्र चैतन्य स्वामी उर्फ दौलत महाराज सातपुते यांचा मृतदेह त्यांच्या निवासस्थानी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. देवेंद्र चैतन्य स्वामी उर्फ दौलत महाराज सातपुते यांचा मृतदेह काल गळफास घेतल्याच्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात आणि त्यांच्या भाविकांमध्ये खळबळ उडाली. या प्रकरणी पोलीस सखोल तपास करत असून ही आत्महत्या की घातपात आहे असा प्रश्न भाविकांना पडला आहे.

समाजाला एक नव्हे तर शेकडो हितेश बनसोडची आवश्यकता : डॉ. लोहीत मतानी

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

समाजाला एक नव्हे तर हितेश बनसोड सारखे एक नव्हे तर शेकडो युवा समाजसेवींची आवश्यकता आहे जे वेळीच रस्ते अपघातग्रस्तांना आपल्या अमुल्य सेवा प्रदान करुण त्यांचा जीव वाचविण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या युवकांनी समोर येऊन महाराष्ट्र पोलिसांच्या खांद्याला खांदा देत सेवा करत आपल्या सामाजिक दायित्वाचे निर्वाहण करावे असे आव्हान डॉ. लोहीत मतानी (आयपीएस) पोलीस अधिक्षक महामार्ग पोलीस विभाग नागपुर विभाग यांनी अण्णाजी कुबिटकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सावनेर येथे आयोजित राष्ट्रीय महामार्ग रस्ते सुरक्षा सप्ताह आयोजनाच्या प्रसंगी आपल्या अध्यक्षीय संबोधनातुन करत म्हटले. रस्ते सुरक्षा ही जवाबदारी फक्त पोलीस प्रशासनाचीच नव्हे तर आपण सर्वांची आहे.

मी विद्यार्थ्यांना वीनंती करतो की आपण जास्तीत जास्त संख्येने "माय भारत" या पोर्टल शी जुळून आपल्या परिवारापासून सुरक्षीत परिवहनाची सुरुवात करा आप्त परिवारातील सदस्यांना वाहन चालवीतांना हेल्मेट तसेच सीटबेल्ट लावण्यासाठी प्रवृत्त करा.नशापान करुण वाहने चालवू देऊ नका, वेगावर नियंत्रण ठेवण्याचा सल्ला द्या.ओव्हरटेक करतांना तसेच वाहन चालवतांना रॉंगसाईड चा वापर करु नये.प्रत्येक वाहनचालकांनी ईतकीच सावधगिरी बाळगली तर आपण रस्ते अपघातात जवळपास पंन्नास टक्के कमतरता आणून अनेकांचे जीव वाचवू शकतो असे मार्मिक आव्हान याप्रसंगी करत हितज्योती आधार फाऊंडेशनचे संस्थापक मुत्युंजय दूत हितेश बनसोड व त्यांच्या सहकारी मित्रांच्या कार्याची प्रशंसा करत हितेश बनसोड यांना शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले.

याप्रसंगी किशोर ढुंडेले तालुका मराठी पत्रकार संघ,सावनेर, सरिता मेश्राम पोलीस उपधीक्षक महामार्ग पोलीस विभाग नागपूर,



श्रीकांत कोळी प्रभारी अधिकारी महामार्ग पोलीस केंद्र पाटणसावंगी(हेटी), दीपक धानोरकर पोलीस उपनिरीक्षक महामार्ग पोलीस केंद्र पाटणसांवंगी, संजय गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक महामार्ग पोलीस केंद्र पाटणसांवंगी, अण्णाजी कुबिटकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केन्द्र सावनेर चे गटनिदेशक तसेच महामार्ग पोलीस केंद्र येथील कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

भारत सरकारच्या सड़क परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय तसेच महामार्ग पोलीस केंद्र हेटी (पाटणसावंगी) यांच्या संयुक्त विद्यमाने 'सडक सुरक्षा मित्र' या उपक्रमांतर्गत येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांसाठी रस्ता सुरक्षा जनजागृती व मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक कर्णल संजीवजी शर्मा व रंजित चौधरी यांनी वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालणे आणि तरुण पिढीमध्ये वाहतूक नियमांबाबत जागरूकता निर्माण करणे व युवा पिढीतील युवांना जिल्हा स्तरीय स्वयंसेवक नियुक्त करणे. राहवीर व पी. एम. राहात अश्या शासकीय योजना ची सुद्धा माहिती देण्यात आली.हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. यावेळी राष्ट्रीय महामार्ग उपविभागीय पोलीस अधिकारी सुनीता मेश्राम, प्रभारी अधिकारी श्रीकांत कोळी, पोलीस उपनिरीक्षक दीपक धानोरकर, मराठी तालुका पत्रकार संघांचे अध्यक्ष किशोर धुंडेले आणि तज्ज्ञांनी प्रशिक्षणार्थ्यांना वाहतुकीच्या नियमांचे महत्त्व पटवून दिले.

या कार्यक्रमला हितज्योती फॉउंडेशनचे संस्थापक हितेश बनसोड व टीम यांच्या कार्याचे महामार्ग पोलिसांकडून विशेष कौतुक व सत्कार करण्यात आला. दुचाकी चालवताना हेल्मेटचा वापर करणे, चारचाकी वाहनामध्ये सीट बेल्ट लावणे, वेगमयार्देचे पालन करणे, तसेच वाहन चालवताना मोबाईल फोनचा वापर टाळणे यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच, अपघात झाल्यास जखमींना तात्काळ वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी 'गुड सॅमेरिटन' (सुजाण नागरिक) योजनेअंतर्गत नागरिकांना कायदेशीर संरक्षण मिळते, याची माहिती देऊन मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले. वाहतूक चिन्हे, सिग्नल प्रणाली आणि सुरक्षित ड्रायव्हिंगच्या सवयी यावरही यावेळी प्रकाश टाकण्यात आला. या कार्यक्रमाला नागपूर महामार्ग पोलीस विभागाचे अधिकारी, कर्मचारी, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे गटनिदेशक मानेकर सर, बोकडे सर, संस्थेतील निदेशक व मोठ्या संख्येने प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रविंद्र लोही यांनी केले व शेवटी सत्राला उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना स्वयंसेवक नियुक्त करण्यात आले.

आयोजनाच्या यशस्वीतेकरीता स्व.अण्णाजी कुबिटकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केन्द्राचे सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी व हितज्योती आधार फाऊंडेशनचे आकाश यादव, नरेंद्र समुदुरकर अभिषेक कोठाडे, राजेश सिंदेवार आदिने परिश्रम घेतले.

निवृत्तीवेतनधारकांनी डिजिटल जीवन प्रमाणपत्र अभियानात सहभागी व्हावे, चेहरा प्रमाणीकरण तंत्रज्ञानाद्वारे घरबसल्या जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : केंद्र शासनाच्या वतीने देशभरात १ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत देशव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र अभियान ५.० राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत चेहरा प्रमाणीकरण (फेस ऑथेंटिकेशन) तंत्रज्ञानाचा वापर वाढवून राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारकांना घरबसल्या डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे. राज्य शासनाच्या सर्व निवृत्तीवेतनधारकांना दरवर्षी जीवन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. वासाठी आता डिजिटल जीवन प्रमाणपत्राची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. चेहरा प्रमाणीकरण तंत्रज्ञानाच्या माध्यमातून निवृत्तीवेतनधारकांना आपल्या अँड्रॉइड स्मार्टफोनद्वारे घरबसल्या जीवन प्रमाणपत्र तयार करता येते. त्यामुळे बँक अथवा कोषागार कार्यालयात प्रत्यक्ष जाण्याची आवश्यकता कमी झाली आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी निवृत्तीवेतनधारकांनी आपल्या अँड्रॉइड मोबाईलमध्ये 'Aadhaar Face RD App' डाउनलोड करावे.

चंद्रपूर व अमरावती संघ मंगळवारी विजेतेपदासाठी लढणार

'अवादा विदर्भ व्हिजन कप' दृष्टिहीन क्रिकेट स्पर्धा, दृष्टिहीन गौरव झाडे व अभिजीतची चकमदार कामगिरी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ह्यअवादा विदर्भ व्हिजन कप दृष्टिहीन क्रिकेट स्पर्धा - २०२६ मध्ये सोमवारी झालेल्या सामन्यांमध्ये चंद्रपूर व अमरावतीच्या संघाने विजेतेपद पटकावत अंतिम फेरी गाठली. मंगळवार, १७ नोव्हेंबर रोजी वसंतनगर येथील मुजुमदार क्रिकेट अकादमीच्या मैदानावर रात्री ९ वाजता हे दोन्ही संघ विजेतेपदासाठी झुंज देतील. अवादा फाउंडेशनफे असोसिएशन फॉर प्रमोशन ऑफ ब्लाइंड क्रिकेट इन विदर्भ आणि नागपूर येथील आत्मदीपम सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा सुरू आहे.

सोमवारी चंद्रपूर आणि नागपूर संघामध्ये सामना झाला. त्यात नागपूर संघाने ६ गडी बाद १९८ धावा केल्या. चंद्रपूर संघाने हा



धावांचा डोंगर १७.१ षटकात ३ गडी बाद १९९ धावा करत पूर्ण केला. चंद्रपूर संघाने ७ गड्यांनी विजय मिळवत अंतिम फेरी गाठली. चंद्रपूर संघाच्या गौरव झाडेने ६० बॉलमध्ये ११३ धावा काढून चमकदार कामगिरी केली. त्याला प्लेअर ऑफ द मॅच व बेस्ट बॅटर चा किताब मिळाला. चंद्रपूरच्या गोकुल पारधी बेस्ट बॉलर तर चंद्रपूरचा अतुल हरोडे फायटर ऑफ द मॅच ठरला.

दुसरा सामना अकोला आणि अमरावती संघात झाला. यात अकोला संघाने ८ गडी बाद १३१ धावा केल्या. हे ध्येय अमरावती संघाने १५.२ षटकात ५ गडी बाद १३३ धावा पूर्ण करून अंतिम फेरी गाठली. अमरावती संघाच्या अभिजीतने ५२ बॉलमध्ये ६६ धावा करत प्लेअर ऑफ द मॅच व बेस्ट बॅटरचा किताब पटकावला. २ गडी बाद करणाऱ्या अकोला संघाच्या महेंदरने फायटर ऑफ द मॅचचा किताब पटकावला.

अमरावती व नागपूर संघांमध्ये झालेल्या सामन्यात नागपूर संघाला अमरावती संघाकडून

संघ-सामने-विजय-पराजय-गुण

चंद्रपूर-३-३-०-६
अमरावती-३-२-१-४
नागपूर-३-१-२-२
अकोला-३-०-०-६

Player of the match



१४ धावांनी पराभव पत्करावा लागला. नागपूर संघ तीन सामन्यांपैकी केवळ १ सामना जिंकून तिसऱ्या स्थानावर राहिला तर अकोला संघाला एकही सामना जिंकता आला नाही.

फत्तापुर शेत शिवारातील कालव्यात वाघाचा संशयास्पद रित्या मृतदेह आढळला

घातपात कि नैसर्गिक मृत्यू वनविभाची कसोटी पणाला



दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे

वरोरा वनपरिक्षेत्रांतर्गत येत असलेल्या टेंमुर्डा उपवनक्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या बारव्हा फत्तापुर येथील शेत शिवारात एका वाघाचा मृतदेह संशयास्पद रित्या आढळल्याने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. फत्तापुर रोडवरील कालव्यामध्ये वाघ मृत अवस्थेत पडल्याचे उघडकीस आल्यानंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार बारव्हा येथील सुरेश मडावी हे नेहमीप्रमाणे सरपण गोळा करण्याकरिता शेतशिवारात गेले होते. यादरम्यान त्यांना पाणी भरलेल्या कालव्यामध्ये एका मृत वाघाचे दर्शन झाले वाघाचा मृतदेह पाण्यात तरंगत असल्याचे दिसून आले. हा धक्कादायक प्रकार पाहताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता तात्काळ घरी परतत गावातील तरुणांना याची माहिती दिली. गावातील पोलीस पाटील विद्या लढी यांना माहिती मिळताच त्यांनी पोलीस स्टेशन वरोरा व वनविभाग अधिकाऱ्यांना कळविले.

वनविभाग अधिकारी येऊन वाघ हा नर असून तिनं ते चार वर्षे वयाचा असल्याचे समजते. वाघाचा मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा सुरू केला व वन अधिकारी यांनी वाघाला आपल्या ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी चंद्रपूर येथील वनविभागाच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात पाठवण्यात आले. या दिमाखदार आणि आक्रमक शैलीच्या वन्य प्राण्याचा मृत्यू नेमका कशामुळे झाला घातपात ही नैसर्गिक मृत्यू याचे उत्तर अजूनही अनुत्तरीत आहे. पुढील तपास वरोरा वनपरिक्षेत्र अधिकारी सुनील मडावी , हे करीत आहे. यावेळी डी. चांभारे क्षेत्र सहायक, टेमुर्डाचे राउंड ऑफीसर चव्हाण, कर्मचारी योगेश लोहकरे हे उपस्थित होते.

श्री संत गजानन महाराजांची कोराडी पायी दिंडी यात्रा उत्साहात

२६ व्या वर्षी पालखीचे कोराडी माता जगदंबा मंदिरात भव्य स्वागत, भक्तिमय वातावरणात वारकऱ्यांचा सहभाग

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्ट, निर्मल नगरी नागपूर यांच्या वतीने आयोजित नागपूर ते कोराडी पायी दिंडी सोहळ्याचे यंदा २६ वे वर्ष मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरे करण्यात आले. रविवारी १५ नोव्हेंबर रोजी, श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे कोराडी येथील प्रसिद्ध माता श्री जगदंबा मंदिर परिसरात भव्य आगमन झाले. यावेळी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने पालखीचे स्वागत केले.

श्रींच्या नामघोषात, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि भक्तिरसात न्हाऊन निघालेल्या या दिंडी सोहळ्यामने संपूर्ण परिसरात मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. दिंडीमध्ये



विविध गावांतील वारकरी, भाविक आणि भक्तगण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातात भगव्या पताका घेऊन सहभागी झालेल्या पताकाधारी वारकऱ्यांनी दिंडीची शोभा वाढवली. या दिंडी सोहळ्यात डोमक, लाडकी आणि चांदूर बाजार येथील पताकाधारी वारकऱ्यांनी विशेष सहभाग नोंदविला. तसेच कोराडी दिंडीतील टाळकरी आणि मृदंगाचार्यांच्या पथकाने आपल्या वादनातून भक्तिमय वातावरण अधिकच रंगतदार केले. टाळ-मृदंगाचा निनाद, हरिनामाचा गजर आणि श्री संत गजानन महाराजांच्या जयघोषाने दिंडी मार्ग भक्तिरसाने भारावून गेला. श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे कोराडी येथे आगमन होताच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. श्रद्धा, भक्ती, एकात्मता आणि वारकरी परंपरेचा सुंदर संगम या पायी दिंडी सोहळ्यात अनुभवायला मिळाला.

गेल्या २६ वर्षांपासून सुरू असलेली ही पायी दिंडी परंपरा भक्तांच्या श्रद्धेचे आणि संत गजानन महाराजांवरील निस्सीम भक्तिभावाचे प्रतीक ठरत आहे. यंदाही मोठ्या उत्साहात पार पडलेल्या या दिंडी सोहळ्याने नागपूर आणि कोराडी परिसरातील भाविकांमध्ये भक्तिमय आनंदाचे वातावरण निर्माण केले. कोराडी जगदंबा मातेच्या मंदिरात तीन हजार भक्तांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली करण्यात आली होती. सगळ्या भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

यावेळी गजानन भक्तांनी अथक परिश्रम घेतले. याप्रसंगी नागपूर-कोराडी पायी दिंडी यात्रेत सहभागी होणारे लाडकी-पताका धारी, कुणाल महाराज फुलझेले-टाळकरी टीम, गायक टीम, मृदुंगाच्या, साऊंड सिस्टीम, फुल सजावट, ह भ प कृणाल महाराज फुलझेले व संच, श्री संत ज्ञानेश्वर महाराज हरिपाठ मंडळ हुडकेश्वर रोड,चोपदार, सुरक्षा रक्षक, सेवेकरी मुले, मंदिरातील सेवेकरी ताई, रस्त्यातील चहा, पाणी, अल्पोहार व्यवस्था करणारे निर्मल नगरी मंदिर, सिरसपेठ श्री बांगडेजी, श्री भुतेजी, कॉटन मार्केट, ताजुदिन बाबा दर्गा, झिंगाबाई टाकळी काळे परिवार, लोलगे परिवार, मानकापूर - श्री गोपाल राऊत व मित्र परिवार, इतर सेवा देणारे श्री चादिकरजी, श्री वैरागडेजी, इतर सर्व सेवेकरी, माऊली भक्तगण, श्री नरेंद्रभाऊ झोड, श्री महालक्ष्मी जगदंबा माता संस्थान कोराडी येथील विश्वस्त मंडळ दिंडी सोहळा साजरा करण्याकरिता ज्या माऊली श्री भक्तांनी आपली सेवा समर्पित केली त्या सर्व मंडळीचे खुप खुप धन्यवाद दिले.